सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
रु. ७०,०००/-
फक्त १० मिनिटात
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २९.१०.२०२५ | अंक नं. १७२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


# ‘शेअर्स’मध्ये गुंतवणुकीतून ज्यादा परताव्याच्या आमिषाने नगरमधील ३ जणांची झाली ७० लाख रुपयांची फसवणूक

नगर – शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास ज्यादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत नगरमधील तिघांची ७० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी श्रीगोंदा येथील आरोपीवर नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत इम्रान बशीर शेख (वय ४९, रा. जीपीओ रोड, हाजी इब्राहीम कॉलनी) यांनी २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फसवणुकीची ही घटना २४ जून २०२४ ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत घडली आहे. फिर्यादी इम्रान शेख यांची समीर शब्बीर सय्यद (रा. मुंजोबा चौक, श्रीगोंदा) याच्याशी ओळख होती. एक दिवस समीर सय्यद याने फिर्यादी यांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवल्यास सध्या जास्त नफा मिळत असल्याचे सांगितले. त्यांना विविध उदाहरणे देत त्यांचा विश्वास संपादन केला.

त्याच्यावर विश्वास ठेवून ज्यादा पैसे मिळण्याच्या आशेने फिर्यादी शेख तसेच त्यांचे बंधू व एक मित्र असे तिघांनी सहा महिन्यांच्या कालावधीत समीर सय्यद याच्याकडे सुमारे ७० लाख रुपये रोख स्वरुपात दिले. या तिघांचा विश्वास बसावा म्हणून सय्यद याने त्यांना बँकेचे कोरे चेक दिले. नंतर काही दिवसांनी फिर्यादी यांनी आरोपीकडे गुंतवणुकीतील परताव्याबाबत चौकशी केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अनेक दिवस पाठपुरावा केल्या नंतरही परतावा ही मिळाला नाही आणि गुंतवणूक केलेली रक्कम ही मिळाली नाही.

त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीने दिलेले चेक बँकेत भरले असता ते न वटता परत आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर अखेर इम्रान शेख यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी समीर सय्यद याच्याविरुद्ध बीएनएस कलम ३१४, ३१६ (२) (५), ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला स.पो.नि. योगिता थोरात या करीत आहेत.

## शेअर मार्केट घोटाळ्यात बुडाले कोट्यावधी रुपये

नगर जिल्ह्यात शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास जादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकार वारंवार समोर येत आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून या प्रकरणी या पूर्वी शेवगाव, नगर शहर, शिर्डी, राहाता, पारनेर आणि श्रीगोंदा तालुक्यातही अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. काही गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

पोलिसांनी या गुन्ह्यांत अनेकांना अटकही केलेली आहे. मात्र पैसे गायब करणारे म्होरके अजूनही पसारच आहेत. ज्यांनी पैसे खाल्ले ते अद्याप गायब पण ज्यांनी गुंतवणूकदारांकडून कमिशन साठी पैसे गोळा केले ते बहुतांशी एजंट पोलिसांच्या हाती लागलेले आहेत. मात्र त्यांच्याकडून रुपयाचीही वसुली झालेली नसल्याने गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळतील की नाही याची शाश्वती आज तरी कोणीही देत नाही परिणामी गुंतवणूकदार हवालदिल झालेले पाहायला मिळत आहेत.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या महिलेचे मंगळसुत्र हिसकावून पळविले

**सावेडी उपनगरातील घटना, चेन स्नॅचिंग रोखण्यात पोलिसांना अपयश**

नगर – शहरासह उपनगरात वारंवार चेन स्नॅचिंगच्या घटना घडतच असून या घटना रोखण्यात तोफखाना व कोतवाली पोलिसांना अपयश येत असल्याचे दिसून येत आहे. कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत विनायक नगर परिसरात झालेली चेन स्नॅचिंगची घटना ताजी असताना आणि तिचा अजून तपास लागलेला नसताना तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत समर्थ शाळेसमोर, प्रोफेसर चौक परिसरात २८ ऑक्टोबर रोजी पुन्हा एक चेन स्नॅचिंगची घटना घडली आहे.

याबाबत रिया महेश पमनानी (वय ५०, रा. विनायक पार्क कॉलनी, प्रोफेसर चौक) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या दररोज सकाळी प्रोफेसर चौक ते पारिजात चौक अशा मॉर्निंग वॉकला जातात. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे ७.४५ वाजता मॉर्निंग वॉकला गेल्या. तेथून परत घरी येताना त्यांनी भाजीपाला खरेदी केला व त्या ८.३० वाजण्याच्या सुमारास समर्थ शाळेसमोरील रावसाहेब पटवर्धन स्मारक समोर आल्या असता त्यांच्या समोरून मोटारसायकलवर दोन इसम आले. त्यांनी त्यांच्या जवळ मोटारसायकल आणली. त्यावरील पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांना काही कळायच्या आत त्यांच्या गळ्यातील १ तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र हिसका मारून तोडले आणि ते दोघे भरधाव वेगात तेथून निघून गेले.

फिर्यादी यांनी त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला मात्र ते प्रोफेसर चौकाच्या दिशेने वेगात पसार झाले.

या चोरट्यांनी अंगात काळ्या रंगाचे जर्किन आणि तोंडाला काळ्या रंगाचे मास्क लावलेले असल्याचे फिर्यादी यांनी पोलिसांना सांगितले. घटनेची माहिती मिळाल्यावर शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक दिलीप टिपरसे, तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे, पोलिस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

याबाबत रिया पमनानी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघा अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


पाहिजेत
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
कॅशियर
जागा : 4 (पुरूष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मोड कारागीर
जागा : 4 (पुरूष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
सराफी क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
बुधवार चालू



तुमच्या कन्स्ट्रक्शन साईटवर नजर ठेवा...
होणारे नुकसान सहज टाळा...
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay





98222 94622 | 94220 87757



कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.



जागा भाड्याने देणे
केडगाव, बायपास रोडटच
२ एकर
(८०,००० स्क्वे.फुट)
जागा भाड्याने देणे आहे
विष्णु
9834637021



SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



शोक संदेश
"वाहेगुरुजी का खालसा वाहे गुरुजी की फतेह"





स्व.सरदार बलदेवसिंग बचनसिंग रजपुत
जन्म ०३/०७/१९५२ स्वर्गवास २३/१०/२०२५
बडे दुःख के साथ कहना पड रहा है कि हमारे पिताजी का स्वर्गवास दि.२३/१०/२०२५ को हो गया है
(उठाला)
गुरुद्वारा भाई दयासिंगजी गोविंदपुरा, अहिल्यानगर
गुरुवार ३०/१०/२०२५
सुबह ११.३५ बजे से ०१.०० तक
शोकाकुल
दिपक (राहुल) बलदेवसिंग रजपुत (लडका)
अमितसिंग दिपक रजपुत (पोता)
दिलदार सिंग (बीर) अजयसिंग शीख (भतीजा)
तरण (बबलु) रंजितसिंग रजपुत (भतीजा)
समस्त रजपुत, शीख, मेहरा, पंजाबी, मालवी परिवार
मो : 9822260676, 7972496673



Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 28 OCT TO 06 NOV
कांतारा दि लेजंड: 08:50 AM, 10:45 AM, 11:50 PM, 01:45 PM, 04:40 PM, 05:30 PM, 10:20 PM
थामा: 08:10 AM, 11:35 AM, 02:20 PM, 07:40 PM, 10:00 PM, 11:10 PM
एक दिवाने की दिवानियत: 09:05 AM, 05:00 PM, 07:30 PM, 08:30 PM
प्रेमाची गोष्ट २: 02:55 PM
टीप: शो च्या वेळा बदलु शकतात
Box Office | bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX



टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 28 ऑक्टोबर ते 06 नोव्हेंबर 2025
Thamma - Hindi: 08:00 AM I 10:45 AM, 01:30 PM I 03:30 PM, 07:20 PM I 09:30 PM
Ek Deewane Ki Deewaniyat: 08:10 AM I 10:55 AM, 04:40 PM I 10:15 PM
Premachi Goshta 2: 07:20 PM
Kantara- A Legend: 09:15 AM, 12:20 PM, 01:35 PM, 04:15 PM, 06:20 PM, 10:10 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001



varshaplastics.com
Varsha Real Product. Real Value.
अटूट रिश्ता जिंदगी भर का
मजबूत व टिकाऊ
उत्पादनांची विश्वासार्ह श्रृंखला!
Unbreakable Household | Garden Pipes | Furniture
HDPE Pipes | Sprinklers | Cleaning Products
200+ PRODUCT RANGE
- AUTHORISED DISTRIBUTOR -
M/s. Abhay Sales Corporation & Hardware
In front of Sarvodaya Colony, beside Gajanan Hospital, Satbhai Mala, Delhi Gate, Ahilyanagar.
Office Mob. 9145008009/9822542011



FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
COURSE DETAILS
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING | ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac+ Students Trained | Job Assistance
100% JOB ASSISTANCE
DiSHA® An ISO 9001:2015 Certified COMPUTER INSTITUTE
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधीअंतर्गत आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी अहिल्यानगर शहरामध्ये १ नोव्हेंबर रोजी 'जिल्हास्तरीय विशेष शिबिरा'चे आयोजन

नगर - ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता लक्ष्मीनारायण कार्यालय, पुणे एस.टी. बसस्थानकाजवळ, स्वास्तिक चौक, अहिल्यानगर येथे विशेष जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत सर्व नामनिर्देशित व पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराला उपस्थित राहावे, असे आवाहन अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक आशिष एम. नवले यांनी केले आहे.

या शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवी तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व बँका या शिबिरात सहभागी होणार आहेत. वित्तीय सेवा विभाग व राज्यस्तरीय बँक समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे खातेदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी मिळणार आहे. दहा वर्षांहून अधिक काळ ज्या ठेवीवर दावा केलेला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी'मध्ये हस्तांतरित केल्या जातात. खातेदारांना त्या ठेवी परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# खड्ड्यामध्ये 'केळीचे झाड' लावत तरुणांनी केले रस्त्यावर आंदोलन

नगर - गावच्या परिसरात रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्डयांमुळे गावकरी प्रचंड त्रस्त झालेले असताना ग्रामपंचायत अथवा जिल्हा परिषद प्रशासन हे खड्डे बुजविण्याकडे दुर्लक्ष करत असल्याने संतप्त झालेल्या तरुणांनी अनोखे आंदोलन केले. रस्त्यावरील खड्ड्यात केळीचे झाड लावून त्याची पूजा केली आणि त्याचे फोटो काढून त्यावर ग्रामपंचायतने लावले विकासाचे झाड, त्याला येणार फळ, त्याचे नाव केळ असा मजकूर लिहून ते फोटो सोशल मिडीयावर व्हायरल केले आहेत. या अनोख्या आंदोलनाची सोशल मिडीयावर जोरदार चर्चा सुरु आहे.

नगर तालुक्यातील भोरवाडी गावात तरुणांनी हे आंदोलन केले आहे. भोरवाडीहून नगर ला येण्यासाठी भोरवाडी ते अकोळनेर हा अवघा ३-४ किमीचा रस्ता आहे. या रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झालेली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या रस्त्यावर गावातही मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांना प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. मोपेड चालविणाऱ्या महिलांना तर वारंवार अपघात होत आहेत. चारचाकी वाहन चालकांचीही खड्डे चुकवताना दमछाक होत आहे.

### सोशल मिडीयावर व्हायरल केलेला फोटो व मजकू ही घेतोयं लक्ष वेधून






भोरवाडी (ता.नगर) येथे रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांत केळीचे झाड लावून प्रशासनाचा अनोख्या पद्धतीने निषेध करण्यात आला.

या रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांची हाडे आणि वाहनांचे स्पेअरपार्ट खिळखिळे होत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून ही दुर्दशा कायम आहे. त्यामुळे गावकरी प्रचंड त्रस्त झालेले आहेत. नुकत्याच झालेल्या दिवाळी सणानिमित्त बाहेरगावी राहणारे गावचे रहिवासी गावात येवून गेले. तसेच पाहुणेही आले होते. या सर्वांनी या रस्त्याच्या दुर्दशेबाबत नाराजी व्यक्त केली.

सदर रस्ता हा जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे, मात्र या रस्त्याच्या दुरावस्थेकडे ना जिल्हा परिषद प्रशासन लक्ष देईना, ना ग्रामपंचायत याबाबत पाठपुरावा करेना, त्यामुळे संतापलेल्या तरुणांनी या रस्त्याच्या दुरावस्थेकडे ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. या तरुणांनी या रस्त्यावरील एका मोठ्या खड्ड्यात केळीचे झाड लावले. त्याला हळदी, कुंकू, गुलाल, हार फुले, कोहळा वाहून नारळही फोडला. या लावलेल्या झाडाचे फोटो मोबाईल मध्ये काढून त्यावर ग्रामपंचायतने लावले विकासाचे झाड, त्याला येणार फळ, त्याचे नाव केळ असा मजकूर लिहून ते फोटो सोशल मिडीयावर व्हायरल केले आहेत. हे आंदोलन परिसरातील गावांमध्ये चर्चेचा विषय ठरले आहे.



रात्रीच्या वेळी वाहने अडवून लुटमार करणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# महामार्गावर रात्री वाहने अडवून लुटमार करणारी टोळी पकडली

नगर - रात्रीच्यावेळी नगर-पाथर्डी रोड वर असलेल्या करंजी घाटामध्ये वाहने अडवुन लुटमार करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली आहे. या टोळीकडून ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या टोळीतील संकेत चिंधु पडवळ (वय २५), नामदेव बाळासाहेब भोकसे (वय २८, दोघे रा. कुरकुंडी ता. खेड जि. पुणे) यांना पकडण्यात आले आहे, तर त्यांचा साथीदार जगदीश सुरेश शिवेकर (रा.करंजविहिरे ता.खेड जि.पुणे) हा फरार आहे. शिवाजी बाळासाहेब पाटेकर (वय ३२, रा. ढोरजळगांव, ता. पाथर्डी) हे १६ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.४५ वाजण्याच्या सुमारास त्यांचेकडील कारमधुन जात असतांना करंजी घाटामध्ये काळ्या रंगाच्या कारमधील आरोपींनी फिर्यादीची कार अडवुन फिर्यादीचे गळ्यातील सोन्याचे चेन व चालकाचे खिशातील ९ हजार ५०० रुपये रोख रक्कम असा एकुण ७४ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल बळजबरीने घेवुन गेले होते. या बाबत पाथर्डी पोलीस स्टेशन येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि.हरिष भोये, पोलीस अंमलदार रमेश गांगर्डे, सुरेश माळी, दिपक घाटकर, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, रमिझराजा आतार, मनोज साखेर, भगवान धुळे यांच्या पथकाने सुरु केला. सदर पथक नगर जिल्ह्यामध्ये व आजुबाजुचे जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती संकलित करुन तपास करत असतांना २८ ऑक्टोबर रोजी पथकास सदरचा गुन्हा हा संकेत चिंधु पडवळ याने व त्याचे इतर साथीदारांनी केला असुन ते कडुस फाटा, खेड, जि. पुणे या ठिकाणी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथकाने तात्काळ कडुस फाटा या ठिकाणी जावुन सापळा रचुन संकेत पडवळ व नामदेव भोकसे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्ह्याबाबत सखोल व बारकाईने विचारपुस केली. त्यांनी त्यांचा साथीदार जगदीश शिवेकर याचेसोबत हा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. ताब्यातील आरोपींकडुन गुन्ह्याचे वेळी वापरलेली हुंदाई कंपनीची व्हेरना कार, दोन मोबाईल असा एकुण ७ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# सौर कृषी पंप सर्व्हेसाठी शेतकऱ्याकडून लाच घेताना महावितरणच्या वायरमनला रंगेहाथ पकडले

नगर - शेतात मंजूर झालेला सौर कृषी पंप बसविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व्हेसाठी शेतकऱ्याला १ हजार रूपयांची लाच मागणाऱ्या महावितरण कंपनीच्या वायरमन ला नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तडजोडी अंती ७०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. अरणगाव (ता. जामखेड) येथील महावितरणच्या शाखा कार्यालयात २८ ऑक्टोबरला दुपारी ही कारवाई करण्यात आली.

सुनिल रघुनाथ नागरे (वय ५४, रा. अरणगाव, ता. जामखेड, मूळ रा. येसगाव, ता. कोपरगाव) असे या पकडलेल्या वायरमनचे नाव आहे. तक्रारदार शेतकऱ्याने त्याच्या शेतात सौर कृषी पंप बसविण्यासाठी महावितरणच्या मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत ६ ऑक्टोबर २०२३ रोजी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यांना २४ नोव्हेंबर २०२४ रोजी कृषी पंप मंजूर झाल्याचा मेसेज महावितरण तर्फे पाठविण्यात आला. त्यानंतर त्यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी कृषी पंपासाठी असणारी ३२ हजार ७५ रुपये ही शासकीय फी महावितरण कडे ऑनलाईन भरली.

त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी वायरमन नागरे याच्या हाताखाली काम पाहणारे कंत्राटी वायरमन यांनी पंप बसविण्याच्या ठिकाणचा सर्व्हे केला. तक्रारदार यांनी पंप बसविण्याच्या जागेच्या सर्व्हे बाबत वायरमन नागरे यांना फोन करून विचारणा केली असता त्याने ही सर्व्हेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १ हजार रुपये लाचेची मागणी केली. याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी २७ ऑक्टोबर रोजी नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली.

ही तक्रार प्राप्त होताच २८ ऑक्टोबर रोजी महावितरण च्या अरणगाव शाखा कार्यालय परिसरात सापळा लावण्यात आला. या सापळ्या दरम्यान वायरमन नागरे यास तक्रारदाराकडून ७०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्याच्या विरुद्ध पो.नि. राजू आल्हाट यांनी दिलेल्या फिर्यादी वरून जामखेड पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नगर बायपास महामार्गावर निंबळक शिवारात पलटी झालेला आयशर टेम्पो (छाया - अमित मन्यार)

## सोपानराव अकोलकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दातरंगे मळा नालेगाव येथील रहिवासी सोपानराव कोंडाजी अकोलकर (वय ८०) यांचे २९ ऑक्टोबर रोजी निधन झाले. नालेगाव अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, १ भाऊ, पुतण्या असा परिवार आहे. राष्ट्रवादी शहर जिल्हा अध्यक्ष अर्बन विभागाचे अरविंद शिंदे यांचे ते सासरे होत.

## अनिल खोंड यांचे अल्प आजाराने निधन




नगर - सर्जेपूरा येथील पारनाईक गल्लीतील रहिवासी अनिल बाळासाहेब खोंड (वय ६५) यांचे २९ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अतुल व अनिल खोंड यांचे ते वडील होत.

## हनुमंत बोबडे यांचे दु:खद निधन



नगर - बालाजीनगर बोल्हेगाव येथील रहिवासी हनुमंत एकनाथ बोबडे (वय ६२) यांचे २८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नितीन, अनंत, मनुश्री, राजश्री बोबडे यांचे ते वडील होत.

## तात्याराम प्रभुणे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - अरणगाव विद्यानगर येथील हॉटेल समाधानचे संचालक तात्याराम विठ्ठल प्रभुणे (वय ८१) यांचे २७ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर आढाव वाडी पिंपळगाव माळवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या टोलवाटोलवीत उड्डाणपुलालाच निर्माण झाला होता 'धोका'

नगर - बायपास रस्त्यावरील निंबळक उड्डाणपुला खाली पाण्याची जलवाहिनी फुटून लाखो लिटर पाणी वाया जात होते. हे पाणी उड्डाणपुलाच्या कॉलमच्या खाली जिरत होते. त्यामुळे उड्डाणपुलाच्या बांधकामाला तडे जाण्यास सुरुवात झाली होती. मात्र ही जलवाहिनी सुपा एमआयडीसीची की महापालिकेची, याबाबत अधिकाऱ्यांमध्ये टोलवाटोलवी सुरु होती. मात्र पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ.दिलीप पवार यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे सदर जलवाहिनी सुपा एमआयडीसी ची असल्याची माहिती समोर आली आणि अधिकाऱ्यांनी तातडीने ती दुरुस्त करण्याबाबत सांगितल्याने भविष्यातील मोठी हानी टळली आहे.

गेल्या अनेक दिवसापासून सुपा औद्योगिक वसाहतीस पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी नगर बायपास महामार्गावर निंबळक चौकात फुटून लाखो लिटर पाणी रोज संततधारेने वाहत होते हे सर्व पाणी पुलाखालील जागेमध्ये साठवून याच ठिकाणी पुलाच्या कॉलम साठी बनवले गेलेले संरक्षित बांधकाम यामध्ये जिरत होते गेल्या दोन महिन्यापासून या फुटलेल्या पाईपलाईन मधून पाणी या ठिकाणी संतगतीने जिरत असल्यामुळे उड्डाणपुलाच्या कॉलमला बांधलेल्या या संरक्षित बांधकामास मोठे तडे गेले होते. याची सर्व माहिती व गांभीर्य पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. दिलीप पवार यांनी वारंवार सुपा औद्योगिक वसाहती चे अभियंता तसेच महापालिकेचे आयुक्त यांना फोनद्वारे कळवली होती व त्याचा वारंवार ते पाठपुरावा करत होते परंतु दोन्ही बाजूने ही फुटलेली पाईपलाईन आमची नसून ती तुमचीच आहे असा कांगावा सुरू होता. या तू - तू - मैं- मै च्या चक्कर मध्ये दोन महिन्याचा कालावधी निघून गेला.

### माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांच्या पाठपुराव्यामुळे भविष्यातील मोठी हानी टळली



निंबळक बायपास उड्डाणपुला खाली पाण्याची जलवाहिनी फुटून पुलाच्या बांधकामात पाणी जिरत असल्याने बांधकामाला गेलेले तडे. (छाया - अमित मन्यार)

परंतु डॉ. दिलीप पवार यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे सरते शेवटी जागे झालेले दोन्ही विभाग एकत्र येत नेमकी पाईपलाईन कुणाची फुटली याची शहानिशा करू लागले आणि वराती मागून घोडे या म्हणीचा प्रत्यय पुन्हा या ठिकाणी आला. ही पाईपलाईन सुपा औद्योगिक वसाहतीलाच जाणारीच असल्याचे ज्यावेळेस समोर आले त्यावेळेस कांगावा करणारे एमआयडीसी व सुपा औद्योगिक वसाहतीचे अभियंता मात्र ठिकाणावर येत पाईपलाईन दुरुस्ती करून देण्यात येईल असे सांगू लागले. परंतु तू तू मैं मैं या वर्तुळामध्ये गेल्या अनेक दिवसापासून अनेकांना हे दूषित पाणीपुरवठा होत गेला व याचा सर्वात मोठा धोका मात्र या अभियंतांना कळला कसा नाही, तो म्हणजे हे पाणी ज्या ठिकाणी गोळा होऊन जिरत होते, त्या कॉलमच्या बांधकामाला मोठमोठे तडे जाऊन हे बांधकाम खाली खचत चालले होते.

काही दिवस हीच परिस्थिती राहिली असती तर पुलाच्या बांधकामालाच याचा मात्र मोठा धोका पोहचून बांधकामालाच मोठी हानी पोहचली असती हे अधिकाऱ्यांना कोण सांगणार .तू तू मैं मैं करणाऱ्या या अधिकाऱ्यांनी सुरुवातीलाच महामार्गाचे काम चालू असताना योग्य रीतीने उभे राहून पाईपलाईनचे काम केले असते तर ही वेळ आलीच नसती हे मात्र तितकेच खरे आहे.

# अहिल्यानगर जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला ठरवण्याची वेळ ड्रग्स आणि वाढत्या गुन्हेगारीबाबत चिंता; पोलिसांना पत्र

नगर - अहिल्यानगर जिल्ह्याने आपल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक सामाजिक आणि सहकार चळवळीच्या माध्यमातून राज्यात आपली विशेष ओळख निर्माण केली आहे. या जिल्ह्याला नुकतेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे नाव दिले आहे. मात्र सध्या जिल्ह्यामध्ये गुंडगिरी, दहशतवाद, अमली पदार्थांची तस्करी वाढली असून पोलिसांचा भाग संपला आहे तेव्हा पोलीस प्रशासनाने आपला खाक्या दाखवत अहिल्यानगर जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला म्हणून पुन्हा प्रस्थापित करावा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली आहे.

अहिल्यानगर पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या पत्रात आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे की, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून राबवलेल्या विकासाच्या योजना व केलेले प्रशासन हे कायम दिशादर्शक ठरले आहे. एक उत्तम प्रशासक व जाणकार राज्यकर्त्या म्हणून त्यांची देशाला ओळख असून त्यांचे नाव जिल्ह्यासाठी असणे हे सर्वांसाठी अभिमानास्पद आहे.

एकेकाळी हा जिल्हा कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने राज्यातील आदर्श आणि गुन्हेगारीमुक्त जिल्हा म्हणून ओळखला जात असे. परंतु अलीकडच्या काळात जिल्ह्यात वाढलेली गुंडगिरी, महिलांवरील अत्याचार, चोऱ्या, अवैध धंदे, अमली पदार्थांची तस्करी यामुळे सर्वसामान्य नागरिक अस्वस्थ झाले आहेत.



आ. सत्यजित तांबे

ड्रग्स च्या वाढत्या घटना सातत्याने नागरिकांच्या कानावर येत आहे. त्याला पोलिसांचे संरक्षण आहे की काय अशी शंका निर्माण व्हावी इतक्या मोठ्या प्रमाणात सहजरित्या ड्रग्स अगदी खेडोपाडी उपलब्ध होत आहेत. आणि ही बाब उत्तम प्रशासक असलेल्या अहिल्यादेवींच्या नावाने असलेल्या जिल्ह्यासाठी अत्यंत लाजिरवाणी ठरत आहे.

जिल्ह्यामध्ये स्थानिक गुन्हे शाखा आहे की नाही आणि असेल तर ती नेमकी काय करते अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याचबरोबर जिल्ह्यात विविध ठिकाणी आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर कार्यरत झाले आहेत. हे जिल्ह्याच्या समाजव्यवस्थेसाठी अत्यंत धोकादायक ठरणारे आहे.

अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील सर्व शहरांमध्ये ट्रॅफिकच्या मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. ट्राफिक पोलीस यंत्रणा कार्यरत आहे की नाही अशी सर्वसामान्यांची भावना झाली आहे.

एकंदरीत जिल्ह्यामध्ये सध्या पोलीस प्रशासनाचा धाक संपलेला आहे. त्यामुळे आता पोलिसी खाक्या दाखवणे गरजेचे आहे. जिल्ह्यात वाढलेली गुन्हेगारी, गुंडगिरी, चोऱ्या, दरोडे, महिलांवरील अत्याचार, अमली पदार्थांची तस्करी, ट्राफिक समस्या, ड्रग्स चे वाढते प्रमाण हे अत्यंत चिंताजनक आहे. यापूर्वीही जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत मी २९ जुलै २०२५ रोजी आपणास स्मरणपत्र दिले होते. तरी आपण स्वतः पुढाकार घेऊन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम बनून पूर्वीप्रमाणे हा जिल्हा आदर्श, गुन्हेगारीमुक्त करावा. तसेच नाशिक शहरात सुरू असलेल्या अभियाना सारखा अहिल्यानगर जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला हा आदर्शवत उपक्रम राबवावा अशी मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### याने पोटाची चरबी होईल कमी

आजच्या धावपळीच्या जीवनात, अस्वस्थ खाण्यापिण्यामुळे आणि ताणतणावामुळे पोट फुगणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. हे केवळ तुमचे स्वरूपच खराब करत नाही तर आरोग्यासाठी देखील चांगले नाही. अशा परिस्थितीत, काळे तीळ जादूपेक्षा कमी नाहीत. त्यात भरपूर पोषक घटक असतात. ते पचनास मदत करते, बद्धकोष्ठता दूर करते आणि पोट स्वच्छ ठेवते, ज्यामुळे जळजळ कमी होते. यामुळे तुम्हाला बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे अनावश्यक अन्न खाण्याची इच्छा कमी होते आणि वजन सुद्धा नियंत्रणात राहते. व्हिटॅमिन ई, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि झिंक सारखे घटक शरीराला आतून मजबूत करतात. काळे तीळ तुमच्या शरीराची कॅलरी बर्न करण्याची क्षमता वाढवतात, ज्यामुळे पोटाची चरबी जलदगतीने कमी होते.

## पाककला

### खजूर अंजीर बर्फी

**साहित्य :** १ किलो खजूर, पाव किलो अंजीर, १ वाटी मिक्स ड्रायफ्रूटचे काप व पाव वाटी लाल भोपळ्याच्या बिया, २ मोठे चमचे तूप,

**कृती :** अंजीर दोन तास पाण्यात भिजवून नंतर त्याचे तुकडे करावेत व मिक्सरमधून फिरवून घ्यावे त्याचप्रमाणे खजुराच्या बिया काढून त्या सुद्धा मिक्सरमध्ये फिरवून घ्यावे. गॅसवर ठेवून त्यामध्ये ड्रायफ्रूट्स घालून तळून बाजूला ठेवावेत त्याचप्रमाणे भोपळ्याच्या बिया ही परताव्या व त्याही काढून ठेवाव्या. त्याच कढईमध्ये उरलेलं तूप घालून त्यामध्ये अंजीर व खजूर घालून छान परतत रहावे. गोळा होईपर्यंत सारखे परतत मिडीयम गॅसवर ठेवावे. नंतर गोळा होत आला की त्यामध्ये तळलेले ड्रायफ्रूट्स टाकावे व छान गोळा झाला की ताटलीला तूप लावून त्यावर हे मिश्रण थापावे वरती तळलेल्या भोपळ्याच्या बिया लावाव्यात थंड झाल्यावर त्याच्या वड्या पाडाव्यात. खजूर अंजीर बर्फी तयार आहे.

## वास्तू

### येथे ठेवा फिश पॉट

घराच्या ईशान्य कोपऱ्यात फिश पॉट किंवा छोटा कारंजा ठेवणे खूप शुभ मानले जाते. ईशान्य दिशेला देवी-देवतांचा वास असतो आणि ही दिशा घरामध्ये खूप महत्त्वाची असते. या दिशेला घाण किंवा जड वस्तू ठेवू नये. पाण्याशी संबंधित वस्तू या दिशेला ठेवल्याने नशिबाचे दार उघडतात आणि धनाचा ओघही वाढतो. मात्र या ठिकाणी घाण पाणी साचू नये याची काळजी घ्यावी. यासोबतच घरातील सर्व नळ योग्य असावेत, ते ठिबकत नसावेत.

## सल्ला

सिक्विन साडीने एक सुंदर लुक मिळतो आणि जेव्हा पॅटर्न थोडा देसी प्रकारचा असतो, तेव्हा ती सामान्य महिलांसाठी पूर्णपणे योग्य असते. हा साडी लूक अतिशय साधा आणि सोबर आहे.

## सौंदर्य

पायांवरील व्रण, डाग घालवण्यासाठी लिंबाची साल त्यावर पाच ते सात मिनिटांसाठी चोळावी. हा उपाय दिवसातून दोनदा असा कमीतकमी सात दिवस तरी करावे. डाग कमी होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५

**दुर्गाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, श्रवण १८।३४, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज तुमचे मन प्रसन्न असेल. नजीकच्या काळात आर्थिक लाभ होण्याची दाट शक्यता आहे. आज तुमची व्यावहारिकता कमी होऊ देऊ नका.

**वृषभ :** फायदेशीर संपर्क निर्माण होतील. कुटुंबातील सदस्यांशी निष्कारण बाबींवर वाद होतील. कामाच्या ठिकाणी निर्णय घेण्याची क्षमता कमी होईल.

**मिथुन :** आर्थिक बाबतीत यश मिळवण्यासाठी आज तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. दुपारपर्यंत तब्येत ठीक राहील त्यानंतर थकवा कमी होईल.

**कर्क :** परिस्थिती बहुतांश चिंतामुक्त राहील. मात्र दिशाभूल करणाऱ्या बातम्यांवर विश्वास ठेवताना सावध रहा अन्यथा घाईघाईने घेतलेले निर्णय हानी पोहोचवू शकतात.

**सिंह :** तुमच्या कामात किंवा व्यवसायात एखाद्याच्या अनावश्यक हस्तक्षेपामुळे तुम्ही कोंडीत सापडू शकता. तुम्हाला यातून बाहेर काढण्यासाठी वडीलधाऱ्यांची मदत होईल.

**कन्या :** आवश्यकतेनुसार आर्थिक फायदा नक्कीच होईल. आज काही काम बिघडल्याने महिलांना काळजी वाटेल, थोडे अधिक परिश्रम केल्यानंतर परिस्थिती सामान्य होईल.

**तूळ :** आज नशीब तुमच्या बाजूने असेल. पिवळ्या वस्तू दान करा. मेहनतीचे फळ मिळेल. सुरुवातीला तुम्हाला अपयशाला सामोरे जावे लागेल

**वृश्चिक :** आज तुम्ही तुमच्या महत्वाच्या कामात यश मिळविण्यासाठी सर्व शक्तीनिशी प्रयत्न कराल.

**धनु :** मन भरकटेल पण एकाग्र आणि कामात मग्न राहील. व्यवसायात आज तुम्ही ज्या योजनेवर काम कराल त्यात फायदा होईल.


**मकर :** घरात किंवा बाहेर नको ते बोलण्याने आदर कमी होऊ शकतो. घरातील कामांसाठी तुम्हाला जास्त मेहनत करावी लागेल.

**कुंभ :** महिलांना कौटुंबिक संबंध टिकवून ठेवण्यास मदत होईल. पहिली भाकरी गाईला खाऊ घाला. कामांकडे दुर्लक्ष करणे अंगलट येईल.

**मीन :** आज तुम्हाला विविध समस्यांना सामोरे जावे लागेल. समाजात निषिद्ध असलेल्या कामांकडे मन अधिक आकर्षित होईल ज्यामुळे घरात कलह होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२९१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२९० चे उत्तर



**आडवे शब्द :-** २) टापटीप; साफसूफ; नीटनेटका ६) एक पक्वान्न ८) चिंता; काळजी ९) पुरुषाच्या नावापुढे लावण्यात येणारा एक सन्मानदर्शक शब्द; श्रीमंत ११) गव्हाचे कणीदार पीठ १३) वेशीवरचा पहारेकरी १५) आसपास; आजूबाजूला १७) शिजलेल्या डाळीचे पातळ कालवण १८) धरणी; वसुंधरा; पृथ्वी २०) स्मशानभूमी २२) जम २३) एकसारखे एकीकडेच पाहणे; एकाग्र दृष्टी २४) सारख्या वजनाचे; बॅलन्स; सारखा तोल

**उभे शब्द :-** १) पूर्ण नसलेला; अपूर्ण २) ठेवण ; बांधा ३) एक पक्षी; कबूतर ४) पातळ कालवण वाढण्याचे स्वयंपाकघरातील एक उपकरण ५) टोळीचा प्रमुख ७) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ १०) गुच्छ; झुबका; समूह; जुडगा १२) वाळण्यासाठी उन्हात घातलेले धान्य १३) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या नाकातून ओवतात ती दोरी १४) मुस्लिमांची किंवा ख्रिश्चनांची स्मशानभूमी १५) कोळिष्टक १६) पलीकडे; झाडाखालचा ओटा १९) लहान; बारीक; छोटा २१) पाढ्यातील सहाची संज्ञा २२) शक्ती; जोर; ताकद

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वेळ निघून गेल्यावर सुचलेला विचार व पिके जळून गेल्यावर पडलेला पाऊस यांची किंमत सारखीच होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नाग आणि साप यात काही फरक आहे का?

साप दिसताच कुणी साप म्हणतं, तर कुणी नाग. अनेकांना साप आणि नाग एकच आहेत, असं वाटतं. पण या दोघांमध्ये असा फरक आहे, जो अनेकांना माहिती नाही. साप आणि नाग यांच्याबाबत तुम्ही ऐकता, वाचता, पाहता. त्यांचे व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. खरंतर साप आणि नाग एक नाहीत. दोघांमध्येही खूप फरक आहे. सापांबाबतचं हे तथ्य अनेकांना माहिती नाही.

खरंतर साप आणि नाग एक नाहीत. दोघांमध्येही खूप फरक आहे. सापांबाबतचं हे तथ्य अनेकांना माहिती नाही.

असं म्हणतात की, नाग अर्ध दिव्य असतात, त्यांच्याकडे काही शक्ती असतात. तर साप दैवीय नसतात. त्यांच्याकडे कोणतीच शक्ती नसते. नाग फणा काढू शकतो. साप ते करू शकत नाही. साप कोणतीही गोष्ट चावून खात नाही, ती तो गिळतो. नागाचे आयुष्य जास्त असतं. तर नागापेक्षा सापाचे आयुष्य कमी असतं. नागाचे आयुष्य जास्त असतं. तर नागापेक्षा सापाचे आयुष्य कमी असतं.

यामध्ये आणखीन एक मतप्रवाह असा आहे की, नाग आणि साप या शब्दांमध्ये फरक असा आहे की नाग हे विशेषतः एका विशिष्ट प्रकारच्या सापाला आणि त्याच्या उपप्रकारांना (उदा., नागराज) संदर्भित करते, तर साप हा सर्व प्रकारच्या सापांसाठी सामान्य शब्द आहे. नाग हे एक विषारी सापाचे एक विशेष नाव आहे, तर साप हा सर्व सापांसाठी वापरला जातो. हा शब्द सर्व प्रकारच्या सापांसाठी (सर्प) वापरला जातो. यामध्ये विषारी आणि बिनविषारी दोन्ही प्रकारच्या सापांचा समावेश होतो.

'नाग' हे एक विशिष्ट प्रकारच्या सापाला आणि त्याच्या उपप्रकारांना (उदा., नागराज) संदर्भित करते. नाग हे विषारी असतात आणि त्यांच्या डोक्यावर विशिष्ट रंगाचे (उदा. पांढरे किंवा केशरी) ठिपके असतात.

### नृसिंहसंहारण

हिरण्यकश्यपूचा नाश करण्यासाठी भगवंतांनी नृसिंहावतार धारण केला. ते कार्य पूर्ण झाल्यावर नृसिंह क्रुद्ध दृष्टीने सगळीकडे पाहू लागले. त्यांच्या तेजामुळे सर्वत्र प्रखर उष्णता निर्माण झाली. तेव्हा प्रलयकाळ होईल असे वाटल्याने ब्रह्मदेवासह सर्व देव घाबरले व ते शंकराकडे गेले. नृसिंहाचे ते असह्य तेज लवकर नाहीसे करावे, अशी त्यांनी प्रार्थना केली. शंकर रूप बदलून नृसिंहाकडे गेले व आपले तेज आवरण्याचा त्यांनी उपदेश केला. पण नृसिंहाने तो न ऐकल्यामुळे महादेवांनी वीरभद्राचे स्मरण केले व युक्तीने आणि ते न जमल्यास भीती दाखवून नृसिंहाचे तेज हरण करावयास त्यांना सांगितले.

त्याप्रमाणे वीरभद्र नृसिंहाकडे गेले व तुझ्या तेजाने सर्व विश्व तप्त झाले असून तू हे आवरण्याची कृपा कर, असे विनवू लागले. विनवणीचा उपयोग झाला नाही, उलट नृसिंह जास्त गर्वाने म्हणू लागले, माझा कोप शंकराचे कैलास जाळण्यासही समर्थ आहे. मी त्रिभुवनात थोर असून सर्व देवांना माझाच आधार आहे. उत्पत्ती, स्थिती व संहार या माझ्याच लीला आहेत.

हे ऐकून वीरभद्राने शंकरांचे चिंतन केले. शंकरांच्या सांगण्यावरून वीरभद्र पुन्हा नृसिंहाकडे गेले व म्हणाले, असा अहंकार बरा नव्हे. मागे ऋषियज्ञाच्या वेळी तुम्ही गर्व केल्यामुळे हयग्रीव अवतार होऊन तुम्हाला शिक्षा झाली. महादेवांचा नंदीही तुमचा पराभव करू शकतो.

महादेवाची योग्यता जाणून तुम्ही त्यांची आज्ञा ऐकावी हे बरे! तमचे युगायुगातील हे अवतार महादेवांच्या कृपेनेच होतात. तेव्हा त्यांचे ऐकून तुम्ही तेज आवरा.

हे सांगण्याचाही काही उपयोग न झाल्याने शंकर अत्यंत उग्र रूप धारण करून तेथे गेले. त्यांचे ते भयंकर रूप पाहून मात्र नृसिंहाचा अभिमान पार नाहीसा झाला. ते शंकरांना शरण गेलं. सर्व देवांनी शंकर व विष्णू दोघांवर पुष्पवृष्टी केली. महादेव प्रसन्न चित्ताने सर्व देवांना म्हणाले, देवहो, मी नृसिंहांची ही स्थिती केली, यातले गूढ समजून घ्या. मला व विष्णूला भिन्न मानण्याचे कारण नाही. त्यानंतर शंकरांनी नृसिंहरूप विष्णूची त्वचा काढून तिने आपला देह झाकला. शिरकमळ तोडून ते मुंडमाळेत ओवून घेतले व ते कैलासास निघून गेले. तेव्हापासून भगवान शंकरांना नृसिंहसंहारण असे नाव पडले आहे.



## जीवन का अमृत (भाग १)

दे और मन में कहता रहे आप का कल्याण हो तो आप का यह भाव उन्हें बदल देगा। अगर आप में कोई उपरोक्त लक्षण या कोई और सूक्ष्म नाकारात्मक विचार है तो उसे खत्म करने के लिये भी यही विचार मन में रखो मैं स्नेही हूं सबसे स्नेह करता हूं आप भी स्नेही हैं। इस से अपना और दूसरों का आज्ञा चक्र जागृत हो जायेगा।

आज्ञा चक्र - ७ - ब्रहस्पति ग्रह

आज्ञा चक्र ब्रहस्पति ग्रह से जुड़ा हुआ है। ब्रहस्पति ग्रह इस चक्र पर गहरा प्रभाव डालता । इसलिये ब्रहस्पति ग्रह के बारे जानना बहुत जरूरी है। यह सब से बड़ा ग्रह है। इस का व्यास १४२८०० किलोमीटर है। इसके ६३ उप ग्रह हैं। सूर्य, मंगल और चंद्रमा का मित्र ग्रह है। बुध और शुक्र का दुश्मन ग्रह है। शनि के साथ तटस्थ सम्बन्ध हैं। यह ग्रह सुनहरी या पीले रंग की तरंगे छोड़ता है। जैसे सूर्य की किरणों से गर्मी महसूस होती है चांद की किरणों से ठंडक महसूस होती है। इस ग्रह से निकली किरणें मनुष्य के आज्ञा चक्र को प्रभावित करती हैं। इस ग्रह से निकलने वाली किरणें मनुष्य की विचार धारा को प्रभावित करती हैं। यह गृह लोगो को हमेशा सही रास्ते पर चलने के लिये प्रेरित करता है एवम मार्ग दर्शन देता है। मानव को ईश्वर एवं दिव्य शक्ति से जोड़ता रहता है। व्यक्ति को जीवन के अलग अलग पहलुओं के प्रति जागरुक करने एवम् उनके हमेशा उसका दिव्य मार्गदर्शन माँगो, उससे नम्रतापूर्वक प्रार्थना करके और अंतर में उसका दर्शन पाने की तीव्र इच्छा करके ।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

हम हमेशा याद रखें कि हमारा लक्ष्य प्रभु किसी भी वस्तु से वास्ता न रखें, जिससे हम प्रभु को भूल जाएँ । हमारी जिंदगी प्रेम और नम्रता, जो एक दूसरे से अलग नहीं हो सकते, पर आधारित होनी चाहिए। अगर हम रूहानी तौर से तरक्की करना चाहते हैं, तो अपने आपको अहंकार से रखें अपने साथियों को तिरस्कार से देखने की बजाय, हम प्रभु का, उसकी दया के लिए धन्यवाद करें और अपने बहन-भाइयों की, उनकी भौतिक और आध्यात्मिक जरूरतों में सहायता करके इसका बदला चुकाएँ। अगर कुछ ऐसे लोग हैं जो सचाई को नहीं समझते या समझना नहीं चाहते, तो हम उनसे क्रुद्ध न हों। वे भी हमारी तरह प्रभु के बच्चे हैं और उन्हें अवश्य ही प्रेम से और विश्वास दिलाकर जीतना होगा ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

प्रति जिम्मेदार बनाने में ब्रहस्पति अपनी महत्वपूर्ण भूमिका निभाता है। यह उदारता एवं दयालुता भरे तरीकों से जीवन के हर पहलु को समझने में मदद करता है। यह ग्रह सुनिश्चित करता है कि अपने सांसारिक लक्ष्यों के अतिरिक्त असली सत्य के करीब पहुंचे।

हरी सब्जियां खायें, अनाज कम से कम खायें, विद्या का दान करें, विद्यार्थियों की मदद करें, आध्यात्मिक कार्यों में समय लगाएं और सहयोग करें। इस से हम इस गृह की शुद्ध तरंगो से जुड़े रहते हैं।

आज्ञा चक्र - ८ -

ब्रहस्पति ग्रह - २

सौर मंडल के प्रत्येक ग्रह की किरणें मनुष्य पर प्रभाव डालती हैं। जैसे चंद्रमा की किरणें ठंडी होती हैं और सूर्य की किरणें गर्मी का अनुभव कराती हैं। ऐसे ही ब्रहस्पति या गुरु ग्रह हमारे आज्ञा चक्र को प्रभावित करता रहता है या कहें कि हमारी सोच, हमारे विचारों को प्रभावित करता है। इस ग्रह की विशेषता यह है कि हमारे में ऐसे विचार पैदा करता है जिस से हमारा कल्याण हो, सुख हो, शांति हो, प्रेम हो । ब्रहस्पति ग्रह सुनिश्चित करता है कि आप अपने सांसारिक लक्ष्यों के अतिरिक्त असली सत्य के करीब पहुंचे। अच्छे कर्म करने और दूसरों की सहायता के लिये प्रेरित करता है। ज्ञान और बुद्धि को सक्रिय करता है जिस से आध्यात्मिकता और दिव्यता आती है। अच्छे एवं बुरे के बीच अंतर करने की समझ देता है, जिस से नैतिकता का विकास होता है। उत्साह, आशावाद, उदारता, दान और दया की भावना का विकास होता है।

### आज्ञा चक्र

ब्रहस्पति के विपरीत होने पर अति आशावाद, मान -हानि, मधुमेह और अहम की समस्यायें होती हैं। विपरीत शरीर में वसा की समस्यायें, गुर्दे और आंतों की समस्याऐं आदि होती गुरु में पेट फूलना, हैं। ये समस्याएँ और भी कारणों से हो सकती हैं। कमजोर पाचन तंत्र का होना, जल्दी जल्दी भोजन खाना, दिनचर्या नियमित न होना तथा एसिडिटी होना कमजोर ब्रहस्पति के कारण भी होती है।

मां-बाप, दादा-दादी, नाना-नानी, दूसरे बजुर्गों वा सम्मानित वा संतों को कष्ट देना या उन की बेजती करना या बेजती करने का विचार आये तो यह विपरीत गुरु ग्रह की पहचान है। भोजन में हरी सब्जियां खायें और अनाज कम से कम खायें, भगवान को विशेष रुप से याद करने से ब्रहस्पति की दशा ठीक हो जाती है अर्थात इस ग्रह की तरंगों की सीध में हमारा आज्ञा चक्र आ जाता है और हम कल्याणकारी सोचने लगते हैं। विपरीत ब्रहस्पति की दशा मानसिक समानता की कमी को दर्शाता है, जिस के कारण विवाह में तनाव, झगडे, तर्क, वितर्क तथा तलाक जैसे परिणाम देखने को मिलते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मास्तर :** जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडतोय याचा भविष्यकाळ सांगा

**राजू :** आता लाईट जातील

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रधान सचिव पदी कोणाची नियुक्ती झाली?

\- अश्विनी भिडे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

परंतु रिकेट्स (फक्क) या आजारामध्ये बालक चालू शकत नाही. आधुनिक शास्त्रानुसार बालकात 'ड' जीवनसत्त्वाची कमतरता असल्यानंतर हा आजार निर्माण होतो. तसेच गर्भवती मातेने गर्भवती जीवनसत्त्वयुक्त पौष्टिक आहार न घेतल्यानेही बालकांमध्ये हा आजार दिसून येतो. हा आजार साधारणत: सहा महिने ते दोन वर्षांच्या बालकांमध्ये दिसतो. ज्या भागामध्ये सूर्यप्रकाश कमी प्रमाणात मिळतो, त्या भागामधील बालकांमध्ये हा आजार दिसून येतो. तसेच गरीब कुटुंबातील मुलांमध्ये पौष्टिक पदार्थ खाण्याच्या कमतरतेमुळे हा आजार जास्त प्रमाणात आढळतो. बालकाचे डोळे, पोट व चेहरा हे मोठे दिसतात. तर त्याचे हात-पाय, मांड्या, नितंब या बारीक, शुष्क झालेल्या असतात. शरीराचा खालील अर्धा भाग हा बारीक असतो, तसेच शरीरावर मांस कमी असते व शरीर हाडांचा सापळा बनते.

### बालकांचे आजार

* आयुर्वेदिक पंचकर्मामध्ये बस्ती, स्नेहपान, स्वेदन, उवर्तन या कर्मांचा उपयोग करून बालकांतील वातदुष्टी कमी करावी व बालकाचे बल वाढवावे.

* बालकास पहिले सात दिवस कल्याणक घृत किंवा अमृतघृत पिण्यास द्यावे. यामुळे शरीरास बल प्राप्त होऊन स्नायूंचे पोषण होते. त्यानंतर ज्येष्ठमध, एरना द्राक्षा, त्रिवृत्त, पुनर्नवा, एरंड यांनी सिद्ध केलेले दूध पिण्यास द्यावे.

* आधुनिक उपचारांमध्ये ६,००,००० युनिट व्हिटॅमिन 'डी' हे दर आठवड्याला बाळाला दुधातून अनेक आठवडे द्यावे._ जर आजाराचे प्रमाण जास्त असेल, तर व्हिटॅमिन 'डी' ५,००० युनिट रोज एक याप्रमाणे काही महिने द्यावे. त्यासोबत कॅल्शिअमचेही औषध सुरू ठेवावे. जर व्हिटॅमिन 'डी'ची मात्रा जास्त झाली, तर बाळाची भूक मंदावणे, अस्वस्थ वाटणे, मलावष्टंभ अशी लक्षणे दिसून येतात. अशा वेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन 'डी'ची मात्रा कमी करावी.

* बालकाला कोवळ्या उन्हात रोज १५ ते २० मिनिटे बसवावे किंवा खेळवावे.

* जोपर्यंत बालक आपल्या पायावर उभे राहू शकत नाही, तोपर्यंत बालकास लाकडाचा तीन चाकांचा पांगळगाडा बनवून द्यावा व त्या गाड्याच्या आधाराने बालकास हळूहळू चालण्यास शिकवावे. बालकाला रोज अंघोळीपूर्वी नारायण तेल, चंदनबलालाक्षादी तेलाने हलक्या हाताने मसाज करून अंघोळ घालावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा जिल्ह्यातील ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उज्वल भविष्याचा मार्ग

नगर – शिक्षण हे संपत्तीपेक्षा मोठं आहे, कारण ते आयुष्य घडवतं या विचाराला मूर्त रूप देत भारत सरकारतर्फे राबविण्यात येणारी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण आणि परीक्षा शुल्क भरपाई योजना ही अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडवणारी ठरली आहे.

सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात अहिल्यानगर जिल्ह्यातील तब्बल ८० हजार ९२१ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये – विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्गीय घटकांतील अनुक्रमे १,३८३ आणि १,३६२ विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळाली, विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) गटातील २२,९७२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली, राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेधावृत्ती योजनेअंतर्गत ११वी व १२वीतील १,३१६ विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला, शिक्षण व परीक्षा शुल्क भरपाई योजनेंतर्गत ओबीसी गटातील ३,६०२, एसबीसी गटातील ३२७ आणि व्हीजेएनटी गटातील १,६६९ विद्यार्थ्यांना शुल्क परतावा मिळाला, व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क परतावा योजनेंतर्गत १,००७ विद्यार्थ्यांना, तर व्यावसायिक महाविद्यालयांच्या वसतिगृहात राहणाऱ्या ४७,२८३ विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याच्या स्वरूपात मदत देण्यात आली.

या योजनेअंतर्गत शासन विद्यार्थ्यांच्या वतीने महाविद्यालयांकडे थेट शिक्षण व परीक्षा शुल्काची रक्कम अदा करते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्णपणे विनाशुल्क होते आणि त्यांच्यावर कोणताही आर्थिक भार पडत नाही. या उपक्रमामुळे अनेक गरीब, ग्रामीण आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार होत आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग (VJNT, OBC, SBC, SEBC) या घटकांतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ – https://mahadbt.maharashtra.gov.in आहे.

सहाय्यक संचालक (मागासवर्गीय कल्याण) विनोद लोंढे म्हणाले, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, हा या योजनेचा मूळ हेतू आहे. शासन विद्यार्थ्यांच्या वतीने थेट शुल्क भरत असल्याने शिक्षणातील समानतेचा मार्ग खुला झाला आहे. सन २०२४–२५ मध्ये तब्बल ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल झाले आहे.

सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी कोणताही आर्थिक अडथळा येऊ नये, हा या योजनेचा मूलभूत हेतू आहे. ही योजना केवळ आर्थिक सहाय्य देणारी नसून समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारी ठरली आहे.

# क्रीडा खेळाच्या माध्यमातून शासकीय सेवेत नोकरी

### भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचे प्रतिपादन; माजी नगरसेविका सोनाली चितळे व धर्मवीर युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने नालेगाव परिसरातील गुणवंत खेळाडूंचा सत्कार


नालेगाव परिसरातील गुणवंत खेळाडूंचा सत्कार अनिल मोहिते व सरचिटणीस निखिल वारे यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

नगर – शालेय जीवनामध्ये शिक्षण घेत असताना क्रीडा स्पर्धेला खूप महत्त्व आहे. जिद्द, चिकाटी, व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते, त्यातून आपल्याला प्रेरणा मिळते व आपले करिअर यशस्वी होते, पूर्वी नालेगावचा जिल्ह्यात दरारा राहिला होता ती परंपरा नवोदित खेळाडू पुढे घेऊन जात आहे, एकाच भागातून १८ खेळाडूंनी राज्य राष्ट्रीय पातळीवर खेळाच्या माध्यमातून चांगली कामगिरी केली असून ही कौतुकाची बाब आहे क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना थेट शासकीय नोकरीत घेतले जाते. सामाजिक प्रश्नांची जाण असणारा कार्यकर्ता म्हणजे अजय चितळे होय. धर्मवीर युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून शहरात स्वच्छतेची मोहीम राबवून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडत असल्याचे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

माजी नगरसेविका सोनाली चितळे व धर्मवीर युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने नालेगाव परिसरातील गुणवंत खेळाडूंचा सत्कार अनिल मोहिते व सरचिटणीस निखिल वारे यांच्या हस्ते झाले. यावेळी सोनाली चितळे, अजय चितळे, केडगाव मंडळ अध्यक्ष शरद ठुबे, दत्ता वाघ, सचिन वाघ, महेश सुरसे, अशोक दातरंगे, आनंद दातरंगे, सागर शिंदे, महेश शिंदे, बाळासाहेब डागवाले, अतुल दातरंगे, मनोज गायकवाड, धंगेकर, करंजुले पैलवान, रोहिदास ठाणगे आदीसह पालक, खेळाडू व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

निखिल वारे म्हणाले की, नालेगावचे नाव सर्व क्षेत्रामध्ये आदराने घेतले जाते. पूर्वी विद्यार्थ्यांना शहरात खेळण्यासाठी मैदाने नव्हती मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात ठिकठिकाणी क्रीडांगणे निर्माण होत आहे. वाडिया पार्क, सारसनगर, गंगा उद्यान येथे सुसज्ज असे खेळाची मैदाने तयार होत आहे. सोनालीताई व अजय चितळे यांनी खेळाडूंच्या पाठीवर शब्बासकीची थाप देण्याचे काम केले आहे असे ते म्हणाले.

सोनाली चितळे म्हणाल्या की, नालेगाव परिसरातील शालेय विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अशी कामगिरी करून अहिल्यानगर शहराचे नाव झळकविले आहे. त्यांचा सत्कार करणे त्यांना प्रोत्साहन देणे आपल्या सर्वांचे काम आहे. क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून चांगला खेळाडू निर्माण होत असतो. खेळाडूंच्या मागे आम्ही नेहमी भक्कमपणाने उभे राहू असे त्या म्हणाल्या.

नालेगाव परिसरातील स्वराज वाघ यांनी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, यशराज वाघ यांनी शालेय स्तरावर झालेल्या स्पर्धेमध्ये गोड मेडल, पियुष वाघ गोल्ड मेडल, मल्हार सुरसै यांनी राज्यस्तरीय कुराश स्पर्धेमध्ये ब्रांझ मेडल, सिद्धी दातरंगे हिने राष्ट्रीय कुराश स्पर्धेमध्ये कांस्यपदक, पार्थ दातरंगे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, रुद्र शिंदे यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, चितंबर शिंदे यांनी शालेय स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, तेजस डागवाले कुस्ती स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, शालेय कुस्ती स्पर्धेसाठी आर्य दातरंगे याची निवड, रुद्र गायकवाड याला धावणे स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल, योगीराज वामन कुस्ती स्पर्धे मध्ये ब्राँझ मेडल, हर्ष ठाणगे याची विभागीय तीरदाजी स्पर्धेत निवड, स्नेहा चितळे बीएचएमएस वैद्यकीय क्षेत्रामध्ये तिसऱ्या वर्षी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण, शिवांजली गायकवाड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग मध्ये प्रथम श्रेणीने उत्तीर्ण, विराट करंजुले राज्यस्तरीय जुदो कुराश स्पर्धेमध्ये सुवर्णपदक, तसेच नॅशनल स्पर्धेत सुवर्णपदक व भारतात प्रथम क्रमांक, काव्या धंगेकर हिने राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत रौप्य पदक विजेती, प्रशांत चितळे व मानस कोंडा यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी केल्याबद्दल या सर्वांचा गौरव करण्यात आला असल्याची माहिती अजय चितळे यांनी दिली.

# शालेय क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी घडला जातो : आमदार संग्राम जगताप

### जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा


वाडिया पार्क येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

नगर – विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण घेत असताना आपल्या आवडीचा खेळ जोपासावा, जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी घडला जातो, खेळाडूंना नोकरीमध्ये आरक्षण असून आपले करिअर करता येते, शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये विविध खेळांचा समावेश केला असल्यामुळे खेळाडूंना क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे, माजी नगरसेवक नितीन शेलार, महाराष्ट्र राज्य किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार यांनी किक बॉक्सिंग खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असल्यामुळे चांगले खेळाडू निर्माण झाले असल्याचे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

वाडिया पार्क येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, निलेश शेलार, जिल्हाध्यक्ष नितीन शेलार, आयोजक सचिन मकासरे, सतीश राजहंस, इकबाल शेख, प्रकाश भोईनवाडा, श्रीकांत पुजारी, ओंकार राठोड, दीपक आनंदकर, जयेश आनंदकर, ज्ञानेश्वर जमदाडे, प्रवीण कोंढावले, खेळाडू, अधिकारी, पालक वर्ग उपस्थित होते

निलेश शेलार म्हणाले की, अहिल्यानगरमध्ये पुणे विभागीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात झाली असून सुमारे साडेतीनशे खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजेते खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळले जाणार आहे, आपल्या शहरांमध्ये अशा क्रीडा होत असल्यामुळे खेळाडूंना प्रेरणा व ऊर्जा मिळत असते, दिवसेंदिवस विद्यार्थी मैदानी खेळापासून लांब चालला असून त्याला शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी पुढाकार घ्यावा असे ते म्हणाले. नितीन शेलार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरागे यांनी केले.

# जिल्हास्तर युवा महोत्सवाचे ३ व ४ नोव्हेंबरला आयोजन

नगर – युवकांचा सर्वांगीण विकास, संस्कृती व परंपरेचे जतन, सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने दरवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सव आयोजित केला जातो. त्याअनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने ३ व ४ नोव्हेंबरला सकाळी १० वा. न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी दिली.

यादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून सांस्कृतिक विभागात लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास विभागात कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व, कविता आदी स्पर्धा होतील. तसेच नवोपक्रम ट्रॅकमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात येणार आहे.

स्पर्धेमध्ये १५ ते २९ वयोगटातील युवक व युवतींना (१२ जानेवारी २०२६ रोजी वयाची गणना १५ ते २९ वर्षे अशी करण्यात येईल) सहभागी होण्याची संधी मिळेल. प्रत्येक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच विभागीय, राज्य व राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल.

युवा महोत्सवासाठी जिल्ह्यातील कृषी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी, महिला मंडळे तसेच १५ ते २९ वयोगटातील युवक–युवतींनी https://docs.google.com/forms/d/e/1FIpQLSdwZtISFhCe2tIj1MqFh5q3dXqPUXv4ttO73wbTGZIšxWcXQ/closedform गुगल फॉर्म लिंकद्वारे ३१ ऑक्टोबरपर्यंत सहभाग नोंदवावा.

# जे. जे. सायन्स अॅकॅडमीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ



वैद्यकीय व अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ येथील माऊली सभागृहात झाला.

नगर – जे. जे. सायन्स अॅकॅडमीच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने नीट, जेईई, एमएचटी–सीईटी या परीक्षांबाबत परिपूर्ण मार्गदर्शन केले जाते. या परीक्षेद्वारे भारतभरातील वैद्यकीय व अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ येथील माऊली सभागृहात झाला. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. सुनील म्हस्के, व्हर्टेक्स इंजिनिअर्सचे संचालक प्रतापसिंग पांडे व बीएआरसीचे अणुवैद्यक शास्त्रज्ञ डॉ. राजशेखरराव बोक्का, अॅड. पुराणिक आणि अरविंद कौसाडीकर उपस्थित होते. अहिल्यानगरबरोबरच मुलुंड (मुंबई) व ठाणे येथील शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्यात योगदान दिले जात आहे.

अॅकॅडमीच्या वतीने संचालक डॉ. कृष्णकांत झा व योगेश जहागिरदार यांनी स्वागत करून इत्यंभूत माहिती दिली. ग्रामीण भारतातील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण मिळण्यापासून वंचित राहतात. त्यामुळेच मुंबई येथील जे. जे. सायन्स अॅकॅडमीने अहिल्यानगरमध्ये शाखा सुरु करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्चविद्याविभुषित करण्याच्या दृष्टीने काही वर्षांपूर्वी मार्गक्रमण सुरू केले. सुरुवातीला रोपटे असणाऱ्या अॅकॅडमीचा आता शिक्षणरूपी वृक्ष झाला आहे. प्रतिभेला चमकण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अॅकॅडमी करते. अहिल्यानगर जवळच्या गावातील एका गरीब कुटुंबातील शेतकऱ्याची मुलगी काजल ढगे हे त्याचे एक ज्वलंत उदाहरण आहे. तिने २०२५ मध्ये परीक्षा देऊन नंदूरबारच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविला आहे. तिची यशोगाथा अधिक सुलभ, उच्च–गुणवत्तेच्या शिक्षणाद्वारे ग्रामीण तरुणांना सक्षम बनवण्याच्या अॅकॅडमीच्या ध्येयाचा पुरावा आहे. या यशामागे प्राध्यापक, समन्वयक आणि कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नांची दखल घेत मनापासून आभार व्यक्त करीत समारंभाचा समारोप झाला.

नीट, जेईई व एमएचटी–सीईटी–२०२५ परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून भारतातील प्रतिष्ठित संस्थांत प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्पणाचा, सातत्यपूर्णता व चिकाटीचा सन्मान करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात रिया कुलांगे (एम्स, नागपूर), बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणेसाठी आर्यन गोसावी, अमेय बोरगे, चैतन्य एस., शमीराज एस, दिग्विजय गायकवाड (ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई), आयुष जाधव (एलटीएमसी, सायन, मुंबई), आविष्कार रोकडे (जीएमसी, छत्रपती संभाजीनगर), काजल ढगे (जीएमसी, नंदूरबार), संदेश पवार (जीएमसी, धुळे), आयूष पाराशर (जीएमसी, अंबरनाथ), गौरव धुमाळ (जीएमसी, वाशिम), तृप्ती बाचकर (शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी) यांच्यासह विविध शासकीय व नामांकित संस्थामध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी, तसेच आयुर्वेदिक व डेंटलसाठी प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

अभियांत्रिकीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी रितेश निमसे (आयआयटी मद्रास), अभिजीत पाटील (एनआयटी राउरकेला), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणेमध्ये अक्षत कोठारी, उज्ज्वल झा, तन्मय भरताल आणि दक्ष चंदे (आयसीटी, मुंबई), कृष्णा रणदिवे (एसपीसीओई, मुंबई), सत्यम गावडे (व्हीजेटीआय मुंबई) यांच्यासह विविध शासकीय व नामांकित अभियांत्रिकी संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.


साईबन मध्ये मोरांचा नैसर्गिक अधिवास पहावयास मिळतो.

# साईबनमध्ये मोरांचा नैसर्गिक अधिवास

नगर – साईबन कृषी पर्यटन केंद्रात रोज संध्याकाळी सुमारे आठ ते दहा मोर आपणास पाहायला मिळतात, कधी जमिनीवर व तर आकाशात उडताना दिसतात त्यांनी येथे असणाऱ्या झाडांच्या घळीत आपला अधिवास केला असून सकाळ झाल्यावर ते बाहेर पडतात, दिवसभर परिसरात फिरून पुन्हा संध्याकाळी येथील झाडामध्ये राहण्यासाठी येतात तर कधीकधी येथे दिवसाही मोर पाहण्यास मिळतात. सुरुवातीच्या काळात एक–दोन असणारे मोर आता त्यांची संख्या १० झाली असून ते निसर्गात मनसोक्त बागडतात, त्यांना येथे नैसर्गिक पोषक वातावरण आहे. मोर लहान गटांमध्ये वावरतात, ज्यात साधारणपणे १ नर आणि ३ ते ५ मादी मोर असतात. ते प्रामुख्याने मोकळ्या जंगलात किंवा शेतात आढळतात. मोर घरटे बांधत नाहीत, ते प्रामुख्याने मोकळ्या जंगलात, शेतात किंवा गवताळ प्रदेशात आढळतात.

# महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त महासंघाचा राज्यस्तरीय मेळावा


सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय सन्मान आणि पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा राज्यस्तरीय मेळावा उत्साहात झाला.

### दरमहा १५ हजार पेन्शनसह विविध सवलतींच्या मागण्या

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय सन्मान आणि पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा राज्यस्तरीय मेळावा अहिल्यानगर येथे उत्साहात झाला. या मेळाव्याचे आयोजन महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त महासंघ या संस्थेच्यावतीने करण्यात आले होते. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला राज्यभरातून समाजभूषण, साहित्यिक, समाजसेवक आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींची उपस्थिती लाभली. या मेळाव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, दादासाहेब गायकवाड पुरस्कार, रोहिदास महाराज पुरस्कार, तसेच मुंदडा आदिवासी पुरस्कार आदीसह विविध पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी हजेरी लावली. सामाजिक न्याय विभागामार्फत सन्मानित झालेल्यांनी समाज, साहित्य, शिक्षण, कला, आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान दिले आहे.

मेळाव्यात पुरस्कारप्राप्त व स्वातंत्र्यसैनिक वयोमानानुसार वृद्ध होत असल्याने त्यांना सन्मानपूर्वक जगण्यासाठी शासनाकडून दरमहा १५ हजार रुपये पेन्शन देण्याची मागणी करण्यात आली. तसेच, पुरस्कारप्राप्त व्यक्तींसाठी एसटी महामंडळाच्या शिवनेरी व शिवशाही बससेवेत विनामूल्य प्रवास सुविधा देणे, एका सोबत्यासह मोफत प्रवास परवानगी, मंत्रालयात एक वर्षाचा प्रवेश पास देणे, तसेच रेल्वे प्रवासासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव ठेवून मोफत प्रवास सवलत मिळवून देणे या मागण्याही मांडण्यात आल्या. या राज्यस्तरीय मेळाव्याचे अध्यक्षस्थान अॅड.वैजिनाथ वाघमारे (समन्वयक, शिवसेना शिंदे गट) यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात सर्व थोर महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. स्वागतपर भाषण जिल्हाध्यक्ष डॉ.काशिनाथ सुलाखे पाटील यांनी केले. प्रस्ताविक नामदेवराव चांदणे यांनी केले.

सूत्रसंचालन बाबासाहेब शेलार यांनी केले. यावेळी अॅड. वाघमारे यांच्या उपस्थितीत नामदेवराव चांदणे यांची महाराष्ट्र राज्य अध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली.

याप्रसंगी अण्णा धगाटे, शंकर तडाखे, राजेंद्र मोहिते, भगवान गोरखे, विश्वनाथ अल्हाट, पोपटराव पाथरे, सुनील सकट, अशोक भोसले, सुनंदा चांदणे, बाळासाहेब शिंदे, कडू बाबा लोंढे, संजय चांदणे, किसन शिंदे, सुमन खरात, हिराबाई गोरखे, दिलीप सोळशे, कल्पना सूर्यवंशी, आरती सकट, वैद्यनाथ सुरनर, शारदा शिंदे, स्वाती काळे, सुदाम आवडे, शेषराव करखेलीकर, राजू खंडजोडे, विजय पारेकर, दिनकर लांडगे, पोपट वाघ, भगवान जगताप आदी उपस्थित होते. मुंबई, ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, नागपूर, अकोला, बुलढाणा, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, सातारा आणि पुणे या जिल्ह्यांतील सर्व पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी उपस्थित होते.

# ‘आनंदऋषीजी नेत्रालया’च्या तारकपूर शाखेत कॉम्प्रेहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटरचा लोकार्पण

**नेत्र, आहार, मधुमेह, किडनी, त्वचारोग आणि कॅन्सर सारख्या गंभीर आजारांवर मिळणार उपचार**

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित तारकपूर येथील आनंदऋषीजी नेत्रालयात डायबेटिक रूग्णांच्या सेवेसाठी कॉम्प्रेहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटरचे लोकार्पण २९ ऑक्टोबर रोजी पार पडले. तारकपूर येथील नेत्रालयाच्या दुसऱ्या शाखेत सुपर स्पेशालिटी ओपीडी सेवा कार्यान्वीत करण्यात आलेली असून, या अंतर्गत तज्ज्ञ डॉक्टरांची टिम रुग्णसेवेसाठी उपलब्ध झाली आहे. कॉम्प्रेहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटरच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, डॉ. आनंद छाजेड, नेत्रालयाचे विभागप्रमुख डॉ. प्रतिक कटारिया, प्रकाश छल्लाणी, पियुष मंडलेचा, क्लिनिकल आहार तज्ञ डॉ. श्रध्दा परदेशी, मधुमेह तज्ञ डॉ. रवीराज गवळी, प्रमोद गांधी, लॅब टेक्निशीयन सानिया अत्तार, नंदिनी पवार आदी उपस्थित होते.



आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत कॉम्प्रेहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटरचा लोकार्पण झाला.

आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर येथील दुसऱ्या शाखेमुळे सावेडी उपनगरातील रूग्णांना मोठा लाभ होत आहे. आता याच ठिकाणी मधुमेह रूग्णांसाठी कॉम्प्रेहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. यामुळे मधुमेह रुग्णांना उच्च दर्जाच्या नेत्रोपचार सेवेसह इतर आजारांवरही उपचार एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. मधुमेह पूर्व काळजी, मधुमेह समुपदेशन, आहार समुपदेशन, मधुमेह गुंतागुत व्यवस्थापन (न्युरोपॅथी, नेफ्रोपॅथी, रेटीनोपॅथी), मधुमेह संबंधित त्वचेच्या समस्या, मधुमेह पायांची काळजी, रक्त व लघवी तपासणी, डायटेशियन कडून मधुमेह रुग्णांनी कोणता आहार घ्यावा, काय खाणे टाळले पाहिजे, कोणते पथ्य पाळले पाहिजे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

क्लिनिकल आहार तज्ञ डॉ. श्रध्दा परदेशी मधुमेह, नेत्र विकार, किडनी, उच्च रक्तदाब, कॅन्सर, मूत्र विकार, मूतखडा, लठ्ठपणा आदी शारीरिक प्रत्येक आजारांसाठी आहार संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. रवीराज गवळी मधुमेह संदर्भात व डॉ. गोविंद कासाट किडनीच्या आजार संदर्भात रुग्णांना उपचार देणार आहेत.

पुणे येथील त्वचारोग तज्ञ डॉ. रंगोली जिरवानकर दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी त्वचेच्या विकारासंदर्भातील आजारांसाठी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे कॅन्सर तज्ञ डॉ. अनिकेत शिंदे संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत रुग्णांच्या तपासणीकरिता उपलब्ध असतील. तसेच विविध तपासण्या व सर्व औषधांसाठी रुग्णांना खास सवलत उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहिती तारकपूर येथील आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलची अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची टिम आणि नेत्रालयाची तज्ञ डॉक्टरांची टिम एकाच छताखाली उपलब्ध असल्याने डायबेटिक व इतर गंभीर आजारांच्या रूग्णांसाठी तारकपूर शाखा मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. या नवीन कॉम्प्रिहेन्सिव्ह डायबेटिक केअर सेंटरचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७०३०९५९४९४ व ८६८६३०१५१५.

# डॉ.सय्यद मुदस्सर व डॉ.निलेश पठारे यांच्या डिझाईन पेटंटची युनायटेड किंगडम येथे नोंद





नगर – आय.एम.एस. व्यवस्थापन संस्थेचे प्राध्यापक डॉ. सय्यद मुदस्सर आणि एमआयडीसीतील न्युवे इंडस्ट्रीयल प्रॉडक्ट्सचे संचालक व संशोधक डॉ. निलेश पठारे यांनी संयुक्तपणे एक डिझाईन पेटंट रजीस्टर केले आहे. एआय पॉवर्ड सप्लाय चेन डिव्हाइस या त्यांच्या अभिनव डिझाईनची युनायटेड किंगडमच्या इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑफिस (UK IPO) येथे डिझाईन पेटंट स्वरूपात अधिकृत नोंदणी (Registration) करण्यात आली आहे.

हे उपकरण कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित असून आधुनिक सप्लाय चेन मॅनेजमेंट व लॉजिस्टिक प्रक्रियांना अधिक वेगवान, सुरक्षित व प्रभावी बनविण्यास सहाय्य करणार आहे. औद्योगिक क्षेत्रात साठा व्यवस्थापन (Inventory Management), ट्रॅकिंग, गुणवत्ता नियंत्रण, वितरण व्यवस्थापन अशा विविध कार्यांमध्ये याचा महत्त्वपूर्ण उपयोग होऊ शकतो. सध्याच्या डिजिटल रूपांतरणाच्या काळात उद्योग संस्थांना वेळ, खर्च व मनुष्यबळ बचत करण्यासाठी असे तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी ठरणार असल्याचे तज्ञांचे मत आहे.

या डिझाईन पेटंट नोंदणीमुळे संशोधकांना त्यांच्या कल्पक डिझाईनला विधिसंरक्षण देण्याचा प्रारंभिक टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण करता आला आहे. पुढील काळात या तंत्रज्ञानाचा विस्तार करून ते प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतरित करण्याचे दोन्ही संशोधकांचे उद्दिष्ट आहे.

डॉ. सय्यद मुदस्सर हे मागील १५ वर्षांपासून व्यवस्थापन क्षेत्रात शैक्षणिक व संशोधन कार्य करीत आहेत. डॉ. निलेश पठारे हे उद्योजकता आणि औद्योगिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

# ‘सेवाप्रीत’कडून उत्कर्ष बालभवनच्या विद्यार्थ्यांसाठी साऊंड सिस्टम भेट

**दिवाळीनिमित्त फराळ, चॉकलेट व शैक्षणिक साहित्याचे वाटप; महिलांनी बालभवनच्या मुलांसोबत लुटला आनंद**

नगर – सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवनच्या विद्यार्थ्यांना साऊंड सिस्टमची भेट देण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना फराळ, चॉकलेट व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. फाऊंडेशनच्या महिला सदस्यांनी मुलांसोबत आतिषबाजीचा आनंद लुटत खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी केली. मंगलगेट येथे प्रकल्प प्रमुख डॉ. सिमरन वधवा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

यावेळी दिपिका चोईथरमानी, गगन वधवा, सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, दिप्ती सबलोक, शेरी धुप्पड, मिनी खत्री, जया मेघनानी, टिना कुमार, गगन बग्गा, रवी नारंग, विमी मक्कर, शिल्पा छाबरा आदींसह फाउंडेशनच्या महिला सदस्या आणि उत्कर्ष बालभवनच्या शिक्षिका उपस्थित होत्या.



सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवनच्या विद्यार्थ्यांना साऊंड सिस्टमची भेट देण्यात आली.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, उत्कर्ष बालभवनमध्ये समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या मुलांना दर्जेदार शिक्षण व आवश्यक सुविधा मिळाव्यात म्हणून सेवाप्रीत सातत्याने योगदान देत आहे. शिक्षण हेच खरे साधन आहे जे या मुलांचे भविष्य उज्वल करू शकते. आम्ही जेव्हा या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य पाहतो, तेव्हा आमच्या सर्व परिश्रमांचे सार्थक झाल्याची भावना निर्माण होते. चांगले विद्यार्थी घडले, तर निश्चितच सक्षम भारत घडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सिमरन वधवा म्हणाल्या की, या मुलांबरोबर दिवाळी साजरी करण्याचा अनुभव अनमोल आहे. सेवाप्रीत फाउंडेशनच्या वतीने त्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री, प्रोत्साहन आणि प्रेम दिल्याने मुलांचा आत्मविश्वास वाढणार आहे. त्यांच्या डोळ्यांतील आनंद पाहून वाटतं, हीच खरी दिवाळी, प्रकाशाची नव्हे तर मनांच्या आनंदाची दिवाळी साजरी केल्याचे समाधान मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवनला सेवाप्रीत फाउंडेशनने यापूर्वी देखील विविध प्रकारे मदत केली आहे. या वेळेस विद्यार्थ्यांसाठी साऊंड सिस्टम भेट देऊन त्यांना शैक्षणिक सादरीकरणे, कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये अधिक चांगली संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना मिळालेला फराळ व विविध वस्तूंने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नेहमीच पाठबळ देत असल्याबद्दल उत्कर्ष बालभवनच्या वतीने सेवाप्रीतचे आभार मानण्यात आले.

# महादेवा योजनेअंतर्गत १३ वर्षांखालील फुटबॉलपटू निवड चाचणीचे आयोजन

नगर – जिल्हा फुटबॉल असोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान महादेवा योजनेंतर्गत १३ वर्षांखालील फुटबॉल खेळाडूंच्या निवड चाचणीचे आयोजन अहिल्यानगर कॉलेज, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. या निवड प्रक्रियेतून पात्र ठरलेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबई येथे लिओनेल मेस्सी या जागतिक कीर्तीच्या फुटबॉलपटूसोबत खेळण्याची अद्वितीय संधी मिळणार आहे. इच्छुकांनी https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEv7 या लिंकद्वारे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

राज्यात फुटबॉल खेळाचा विकास व प्रसार करण्यासाठी क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महादेवा ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी फुटबॉल खेळाडू निवड चाचण्यांचे आयोजन जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर करण्यात येणार आहे. संबंधित शाळांनी आपल्या शाळेतील १३ वर्षांखालील मुले व मुलींना ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता चाचणीस्थळी उपस्थित राहावेत. खेळाडूंनी बरोबर मूळ आधारकार्ड व जन्मप्रमाणपत्र आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# काळजी आणि समर्थन

## मानवी संवेदनांचा सामाजिक पाया

२९ ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने ‘आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन’ (International Day of Care and Support) म्हणून जाहीर केला आहे. २०२३ साली प्रथमच या दिवसाची घोषणा करण्यात आली आणि यामागचा उद्देश असा की, ‘काळजी’ (Care) आणि ‘समर्थन’ (Support) या मानवी जीवनातील मूलभूत पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या क्षेत्रांना जागतिक स्तरावर ओळख, मान्यता आणि धोरणात्मक प्राधान्य मिळावे. आजचा हा दिवस फक्त एक प्रतीकात्मक उत्सव नाही, तर तो मानवतेच्या अस्तित्वाचा, समाजाच्या एकतेचा आणि मानवी विकासाचा पाया असलेल्या काळजीच्या मूल्यांचा सामाजिक आराखडा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर काळजी आणि समर्थन ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या रचनेतील सर्वात महत्त्वाची सांस्कृतिक, आर्थिक व भावनिक संस्था आहे. समाजशास्त्रात एमिल दुर्खीम यांनी मांडलेले ‘सामाजिक ऐक्य’ (Social Solidarity) हे संकल्पनात्मक तत्त्व सांगते की प्रत्येक समाज टिकून राहण्यासाठी सदस्यांमधील नैतिक जबाबदारी, सहकार्य आणि परस्पर आदर आवश्यक असतो. काळजी आणि समर्थन ही या सामाजिक ऐक्याचीच व्यावहारिक रूपे आहेत. आपण जेव्हा दुसऱ्याच्या आरोग्याची, दुःखाची, वृद्धापकाळाची, अपंगत्वाची किंवा बालकांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो, तेव्हा आपण समाजाच्या नैतिक आरोग्याला बळ देतो. दुर्खीमप्रमाणे, समाज हे केवळ कायद्याने किंवा शासनाने चालत नाही; ते चालते ते सामाजिक मूल्यांवर, आणि काळजी ही त्यातील सर्वात महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे.

इतिहासात पाहिले तर काळजीची संकल्पना मानवी जीवनात आदिम समाजापासून आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था, गावसमाजातील परस्पर साहाय्य प्रणाली, धार्मिक दानसंस्था या सर्व काळजीच्या सामाजिक संस्थाच होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आणि आधुनिकतेच्या प्रवाहात, घरगुती क्षेत्रातील काळजीचे काम हळूहळू आर्थिक मूल्यांशिवाय, अदृश्य व अवमूल्यित झाले. विशेषतः स्त्रिया या काळजीच्या कामात गुंतलेल्या राहिल्या, आणि या कामाला स्वाभाविक मानले गेले. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे ‘लिंगाधारित श्रम विभाजन’ म्हणून ओळखले जाते. स्त्रीवादी समाजशास्त्रज्ञ आर्ली होच्सचाइल्ड (Arlie Hochschild) यांनी त्यांच्या "The Managed Heart' या ग्रंथात "Emotional Labour' ही संकल्पना मांडली. त्यांनी दाखवून दिले की स्त्रिया फक्त शारीरिकच नव्हे, तर भावनिक श्रम देखील सतत करतात, काळजी घेणे, समजून घेणे, सहानुभूती दाखवणे हे सर्व त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. परंतु या श्रमाचे ना आर्थिक मूल्यमापन होते, ना सामाजिक सन्मान मिळतो. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने ‘आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन’ स्थापन करताना जगभरातील काळजी क्षेत्रातील असमानता आणि अवमूल्यन दूर करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. UN Resolution A/RES/78/220 (2023) नुसार, काळजी आणि समर्थन क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, कामगार हक्कांचे संरक्षण करणे, आणि लिंगभाव समानतेला चालना देणे हे या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जागतिक कामगार संघटना – २०२२) च्या "Care at Work' अहवालानुसार, जगभरात सुमारे ३७७ दशलक्ष लोक काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यापैकी ७६ टक्के महिला आहेत. परंतु त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षा आणि सामाजिक मान्यता अत्यल्प आहे.

भारतातील वास्तवही फार वेगळे नाही. घरगुती मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, वृद्ध व अपंगांच्या निगेसाठी काम करणाऱ्या महिला या सर्वजणी काळजी क्षेत्राचे अदृश्य आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामामुळे समाजाची आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य टिकून आहे, तरीही त्यांचे श्रम ‘सेवा’ म्हणून पाहिले जातात, ‘काम’ म्हणून नव्हे. अमर्त्य सेन यांनी त्यांच्या Capability Approach मध्ये म्हटले आहे की व्यक्तीची क्षमता वाढवण्यासाठी सम ाजाला आधार आणि काळजी देणारी रचना आवश्यक आहे. जर समाजाने काळजीला प्राधान्य दिले नाही, तर विकास केवळ आकड्यांत मर्यादित राहतो, मानवी जीवनाच्या गुणवत्तेपर्यंत पोहोचत नाही. समाजशास्त्रज्ञ पियरे बोरदियू (Pierre Bourdieu) यांच्या Social Capital संकल्पनेनुसार, समाजात परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामंजस्य या घटकांमुळे सामाजिक भांडवल तयार होते. काळजी आणि समर्थन हे या सामाजिक भांडवलाचे मूळ आहे. ज्या समाजात काळजीचा अभाव आहे, तिथे तुटलेली नाती, एकाकीपणा आणि सामाजिक तणाव वाढतो. वृद्ध व्यक्तींना, अपंगांना किंवा आजारी लोकांना दुर्लक्षित करणारा समाज हा केवळ असंवेदनशीलच नाही, तर सामाजिकदृष्ट्या दुर्बलही ठरतो. म्हणून काळजी ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या स्थैर्याचा, समावेशकतेचा आणि मानवतेचा पाया आहे.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत "Care Economy' ही एक नवी संकल्पना उदयास आली आहे. ही अर्थव्यवस्था त्या सर्व सेवांवर आधारित आहे ज्या लोकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणासाठी आवश्यक आहेत. जसे की आरोग्यसेवा, बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, शिक्षण, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक कार्य. UN Women (2023) च्या अहवालानुसार, जर देशांनी काळजी क्षेत्रात फक्त २ टक्के GDP इतकी गुंतवणूक केली, तर पुढील दशकात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. म्हणजेच, काळजी आणि समर्थन हे आर्थिक विकासाचेही साधन आहे. कोविड–१९ च्या काळात काळजी क्षेत्राचे खरे महत्त्व जगाने अनुभवले. डॉक्टर, नर्स, साफसफाई कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवक यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता समाजाला जिवंत ठेवले. पण या काळात त्यांना ज्या प्रकारे कमी वेतन, असुरक्षितता आणि थकवा सहन करावा लागला, त्यातून समाजातील काळजीच्या असमानतेचे चित्र समोर आले. ही महामारी एक आरसा होती, ज्यात आपल्याला दिसले की समाजाला चालवणारी खरी शक्ती ‘काळजी’च आहे, आणि तिच्याशिवाय विकास, प्रगती, तंत्रज्ञान हे सर्व रिकामे आहेत.

काळजी आणि समर्थन या संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या केवळ व्यक्तींमध्ये नव्हे, तर पिढ्यांमध्येही लागू होतात. वृद्धांचा सन्मान, बालकांचे संगोपन, अपंगत्वाचा स्वीकार, पर्यावरणाची काळजी ही सर्व पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी आहे. इको–फेमिनिस्ट वंदना शिवा (Vandana Shiva) यांनी दाखवून दिले की स्त्रिया आणि निसर्ग या दोघांनाही काळजीच्या भावनेशी जोडले गेले आहे; म्हणून पर्यावरण संवर्धन, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक समता हे तिन्ही एकमेकांशी निगडित आहेत. काळजी म्हणजे केवळ व्यक्तीची नाही, तर पृथ्वीचीही जबाबदारी घेणे आवश्यक आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत सेवा, ममता, दया, सहाय्य, करुणा ही मूल्ये काळजीच्या संस्कृतीचा भाग आहेत. या तत्त्वात सर्व जीवांची काळजी घेण्याची भावना अंतर्भूत आहे. परंतु दुर्दैवाने, आधुनिक काळात या मूल्यांचा प्रत्यक्ष सामाजिक आचरणात अभाव दिसतो. वृद्धाश्रमात राहणारे पालक, दुर्लक्षित अपंग नागरिक, मानसिक आरोग्याविषयी असलेला कलंक हे सर्व काळजीच्या संस्कृतीच्या क्षीणतेचे प्रतीक आहेत. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने काळजी ही नव्याने जागविण्याची गरज आहे. काळजी आणि समर्थन यांचे सामाजिक संस्थात्मकरण म्हणजेच धोरणात्मक पातळीवर त्यांना स्थान देणे. भारतात राष्ट्रीय आरोग्य मोहिमा, वृद्ध आरोग्य मिशन, बालविकास योजना, दिव्यांग कल्याण योजना, मानसिक आरोग्य धोरण अशा अनेक योजना काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र या योजनांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांच्या सन्मान, वेतन आणि सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. काळजी कामगारांना ILO Convention 189 अंतर्गत हक्क देणे, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, आणि प्रशिक्षण या बाबी सरकारच्या प्राधान्यक्रमात याव्यात.

आजच्या डिजिटल समाजात काळजीचे स्वरूपही बदलले आहे. टेलिहेल्थ, ई–काउंसिलिंग, ऑनलाइन सपोर्ट नेटवर्क्स या नव्या माध्यमांमुळे काळजीचा आवाका वाढला असला तरी, मानवी स्पर्श हरवण्याची भीतीही निर्माण झाली आहे. समाजशास्त्रज्ञ झिग्मुंट बाऊमन (Zygmunt Bauman) यांनी "Liquid Modernity' मध्ये म्हटले आहे की आधुनिक समाजात नाती द्रवरूप झाली आहेत, म्हणजेच स्थिरता, बांधिलकी आणि सहानुभूती कमी झाली आहे. म्हणून काळजीची नवी संस्कृती उभारण्यासाठी डिजिटल जगातही मानवी संवेदना जपणे आवश्यक आहे. ‘आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन’ आपल्याला स्मरण करून देतो की काळजी हा विकासाचा पाया आहे. जेव्हा एक समाज आपल्या सर्वात दुर्बल घटकांची काळजी घेतो, तेव्हा तो खरोखर प्रगत ठरतो. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कुटुंब, शिक्षण, आरोग्य, कामकाज, राजकारण, पर्यावरण यांची काळजी आणि समर्थन ही केंद्रस्थानी असली पाहिजेत. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे, तर काळजी ही मानवी नातेसंबंधांची सामाजिक संस्था (Social Institution of Human Relations) आहे; ती तुटली, तर समाजाचे मूल्यतंत्रच ढासळते.

शेवटी, काळजी आणि समर्थन म्हणजे केवळ भावनिक क्रिया नाही, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक गुंतवणूक आहे. काळजी घेणारा समाज हा केवळ सभ्यच नव्हे, तर सशक्त, समावेशक आणि संवेदनशील समाज असतो. म्हणूनच आजच्या या दिवसाचे महत्त्व असे की आपण काळजीला दया म्हणून नव्हे, तर सामाजिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक माणूस दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी घेईल, प्रत्येक संस्था मानवी सन्मानाचे रक्षण करेल, आणि प्रत्येक शासन काळजी क्षेत्राला प्राधान्य देईल तेव्हा तो दिवसच मानवतेचा खरा उत्सव ठरेल.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



भिंगार येथील इंदिरा सेवा वस्तीत ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशन तर्फे सालाबादप्रमाणे याही वर्षी दिवाळी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# इंदिरावस्तीत बोल फाऊंडेशन तर्फे दिवाळी आनंदोत्सव

नगर – भिंगार येथील इंदिरा सेवा वस्तीत ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशन तर्फे सालाबादप्रमाणे याही वर्षी दिवाळी आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वर्षी टर्न अराउंड ग्लोबल सर्व्हिसेस या कंपनी तर्फे २५० पॅकेट्सचे गरीब, निराधार, गरजू व वंचितांना प्रेमाने व आनंदाने वाटप करण्यात आले. फाऊंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे, सहसंस्थापक अमित पाटोळे, सचिव शोभा पाटोळे तसेच स्वयंसेवक आंतोन पाटोळे, अनिकेत पाटोळे व अण्णाभाऊ गवळी यांच्या हस्ते मिठाई पुड्यांचे वाटप करण्यात आले.


इंदिरा सेवा वस्तीतील एकूण १९० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला. या प्रसंगी शिंदे आजींना – एक वृद्ध गरजू महिलेला चालण्यासाठी नवीन वॉकर संस्थापक गौरव पाटोळे यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच भिंगार गावातील विखुरलेल्या गरजू, गरीब व वंचित अशा सुमारे ६० लोकांना मिठाई पुड्यांचा लाभ देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव शोभा पाटोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहसंस्थापक अमित पाटोळे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अनिकेत पाटोळे, आंतोन पाटोळे, जोसेफ पाटोळे, नंदाताई रॉय व धनंजय घोरपडे यांनी योगदान दिले.

# सुरेश खामकर व लतीफ राजे यांची ‘वसुंधरा मित्र’ म्हणून नियुक्ती





नगर – येथील हरियाली संस्थेचे अध्यक्ष, वनश्री सुरेश खामकर व ढवळपुरी येथील लतीफ राजे यांची महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ’वसुंधरा मित्र’ म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामधील माध्यमिक विद्यालयांमध्ये ’राष्ट्रीय हरित सेना’ या इको क्लब च्या विद्यार्थ्यांनां पर्यावरण विषयी कृतीशील शिक्षण देण्यासाठी संबंधित विद्यालयातील हरित सेनेच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरिता वसुंधरा मित्र अर्थात मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती करण्यात आली असून याबाबत नाशिक येथे विभागीय कार्यशाळा नुकतीच पार पाडली असून येथे वसुंधरा मित्र म्हणजेच मास्टर ट्रेनर यांचे प्रशिक्षणही पार पडले आहे.

सुरेश खामकर हे अहिल्यानगर शहर व परिसरात गेल्या अनेक वर्षापासून हरियाली संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व संरक्षण याविषयी विविध कार्यक्रम, उपक्रम आणि प्रकल्पाच्या माध्यमातून व पर्यावरण याविषयी कृतिशील कार्य करीत आहेत.

लतीफ राजे हे ढवळपुरी येथे प्राथमिक आश्रम शाळेत कार्यरत असून ते पारनेर तालुक्यात सृष्टी मित्र या संस्थेच्या माध्यमातून कार्य करीत आहे. या दोघांची महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ’वसुंधरा मित्र’ म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र अमोल जाधव, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अहिल्यानगर यांनी दिले आहे. हे दोन्ही वसुंधरा मित्र जिल्ह्यातील हरीत सेनेच्या शाळा असलेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांना लवकरच कार्यशाळा घेऊन पर्यावरण विषयक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# दगडामुळे तो झाला कोट्यधीश!

कधी कुणाचं नशीब उघडेल याचा काही नेम नाही; मग तुम्ही श्रीमंत असा वा गरीब. तुम्ही कोणत्याही जाती धर्माचे असा वा पंथाचे; नशिबासमोर सर्व सारखे असतात. फक्त तुमच्या दैवात श्रीमंतीचा योग हवा. एका आदिवासी मजुराच्या बाबतही असंच काहीसं घडलं. देवीच्या दर्शनानंतर हा आदिवासी मजूर घराकडे निघाला होता. रस्त्यात त्याला एक चमकणारा दगड सापडला. त्याने तो घरी नेला आणि रातोरात करोडपती झाला. त्याला काय सापडलं होतं? अचानक हा मजूर श्रीमंत कसा झाला?

गोविंद सिंह असं या ५९ वर्षीय आदिवासी व्यक्तीचं नाव आहे. तो मध्य प्रदेशातील रहुंनिया गर्जर येथील रहिवासी आहे. रोजच्याप्रमाणे तो सकाळी खेर मातेच्या दर्शनासाठी मंदिरात गेला. मंदिरात दर्शन घेतल्यानंतर परतत असताना त्याला रस्त्याच्या बाजूला काही तरी चमकत असल्याचं दिसलं. त्याने उत्सुकतेने तो दगड उचलला आणि घरी घेऊन गेला. घरच्यांना दाखवल्यानंतर तो काही साधासुधा दगड नसून हिरा असल्याचं लक्षात आलं. तो एक-दोन नव्हे तर ४.०४ कॅरेटचा जेम क्वॉलिटीचा हा हिरा होता.

गोविंद तात्काळ हा हिरा घेऊन एका दुकानात गेला. तिथे त्याने हिरा तपासून पाहिला. तेव्हा तो हिराच असल्याचं समजलं. हिरे पारखी अनुपम सिंह यांनी या हिऱ्याची तपासणी केली. हा एक जेम क्वॉलिटीचा हिरा आहे. मार्केटमध्ये या हिऱ्याला चांगली मागणी आहे, असं अनुपम सिंह म्हणाले. हा हिरा आता लिलावात काढला जाईल. लिलावातून मिळणाऱ्या सर्वाधिक बोलीतील ११.५ टक्के रक्कम रॉयल्टी म्हणून कापली जाईल आणि उरलेली रक्कम या मजुराच्या खात्यात जमा केली जाईल, असं अनुपम सिंह म्हणाले.




हिरा सापडल्यानंतर गोविंद सिंह आणि त्याच्या कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. मजुरी आणि शेती करणाऱ्या या कुटुंबाला तर नशिबाने आपल्याला एक चांगली संधी दिली असं वाटतंय. हिरा सापडल्यानंतर गोविंदनेही प्रतिक्रिया दिली. तो म्हणतो, मी गेल्या तीन वर्षांपासून नियमितपणे माता राणीचं दर्शन घ्यायला जातो. माझ्याकडे ट्रॅक्टर आहे. ट्रॅक्टरद्वारे शेती करतो. आता हिऱ्याचे पैसे आल्यानंतर मी अर्धवट बांधलेलं घर पूर्ण बांधेन आणि पैसे वाचले तर नवीन ट्रॅक्टरही खरेदी करेन.

अलिकडेच मी नेहमीप्रमाणे माता राणीच्या दर्शनला गेलो होतो. परत येताना मला रस्त्यात चमकणारा दगड सापडला. मध्य प्रदेशमधील पन्ना जिल्हा हिरे आणि खाणीसाठी प्रसिद्ध आहे; पण ही घटना या मजुरासाठी एका स्वप्नासारखी आहे. रस्त्याच्या कडेला सापडलेल्या एका वस्तूने त्याचं आयुष्य बदललं.

# कॅलिडोस्कोप

# विनोद...



### एक निरिक्षण...

नवरे सुंदर असतात म्हणून चांगलं आहे...
नाही तर दोघांच्या ब्युटी पार्लरचा खर्च कुणाला परवडला असता...!

### किल्ला कुठे?

वेळ- दिवाळीच्या तोंडावरील
**मी छोट्या मुलाला:** काय रे, या वर्षी किल्ला नाही केलास?
**छोटा मुलगा:** केलेला, पण आता रिडेव्हलपमेंटला गेला...!

### काय सांगता?

नवरा-बायकोचं नातंच वेगळं असतं. तुझं माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना या प्रकारच्या नात्यात अडकलेल्या नवरा-बायकोचे अनेक विनोद प्रचलित आहेत. त्यातील एक बघा..
बायकोपेक्षा जास्त रिस्पेक्ट तिच्या साड्या देतात.
.कपाट उघडलं की सरळ पायावर पडतात.

### वाढदिवस कधी?

**बंड्या :** अरे, आज सकाळी सकाळी नानाला फोन केला होता. त्याला विचारलं तुझ्या लग्नाचा वाढदिवस कधी असतो?
**रामा :** मग काय म्हणाला नाना?
**बंड्या :** काय सांगू तुला. माझ्या प्रश्नाला उत्तर देताना नाना म्हणाला, 'एक मिनिट थांब. भांडीच घासतोय. तांब्यावर तारीख पाहून माझ्या लग्नाचा वाढदिवस कधी आहे ते सांगतो'.

### साक्षात्कार

रामनाथने बरेच दिवस केस कापले नव्हते. त्याचा अजागळ अवतार पाहून अनेकांना आश्चर्य वाटत होतं. परंतु त्याने केस वाढवण्याचा हट्टच धरल्याने कोणी काही बोलत नव्हतं. असं असताना अचानक तो सलूनमध्ये गेला आणि म्हणाला, 'माझे केस बारीक कापा.
**कटिंगवाला :** किती बारीक कापू ते तरी सांगा.
**रामनाथ :** बायकोच्या हातात येणार नाहीत इतके ...

### प्रवास

एक आजोबा रस्त्याने चालत जाताना आकाशाकडे बघत असतात. वर पहात निवांत चालत असताना ते नेमके एका बाईच्या गाडीसमोर येतात. अचानक ब्रेक दाबताना तिची तारांबळ उडते.
**बाई :** (गाडी थांबवून ओरडते) अहो आजोबा, जिकडे जायचं आहे तिकडे बघत चाला ना. अन्यथा जिथे बघताय तिथे पोहोचाल...

# 'त्यां'ना नाही मतदानाचा अधिकार...


भारतात मतदान करणं म्हणजे एक उत्सव असतो. कारण लोकप्रतिनिधी म्हणून कोणता नेता योग्य आहे, हे फक्त मतदार ठरवत असतो. मतदान करणं हा प्रत्येक भारतीयाचा हक्क आहे. नागरिकांना आपले सरकार निवडण्याची संधी मिळते; मात्र काही लोक भारतात राहूनही मतदान करू शकत नाहीत. आपल्या देशात १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार आहे; पण आपल्या देशात असे काही लोक आहेत, ज्यांना नागरिक असूनही मतदानाचा अधिकार नाही. भारतात (आणि सर्वसाधारणपणे अनेक लोकशाही देशांमध्ये) काही लोक मतदान करू शकत नाहीत. म्हणजेच, त्यांना मतदान करण्याची परवानगी नाही किंवा नोंदणीपासून वगळण्यात आले आहे.



लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ आणि भारतातील इतर संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार, एखाद्याकडे नागरिकत्व नसेल; थोडक्यात भारताची नागरिक नसलेली व्यक्ती मतदार यादीत आपले नाव नोंदवू शकत नाही आणि मतदान करू शकत नाही. एखाद्या व्यक्तीला न्यायालयाने अक्षम किंवा मानसिकदृष्ट्या अस्थिर घोषित केले असेल, तर तो मतदान करण्यास पात्र ठरत नाही.

लोकप्रतिनिधीत्व कायद्याच्या कलम ६२(५) मध्ये म्हटले आहे की, तुरुंगवासाची शिक्षा भोगत असलेली किंवा पोलिस कोठडीत असलेली व्यक्ती कोणत्याही निवडणुकीत मतदान करू शकणार नाही. एखाद्या व्यक्तीला निवडणुकीदरम्यान भ्रष्टाचार किंवा इतर गुन्ह्यांसाठी दोषी ठरवण्यात आल्यास विशिष्ट कालावधीसाठी मतदान करण्यास अपात्र ठरवले जाऊ शकते. मतदानाच्या पात्रतेला प्रतिबंधित करणाऱ्या इतर अनेक गुन्ह्यांसाठी किंवा कृत्यांसाठी (जसे की मतदारांवर प्रभाव पाडणे, नोंदणी रद्द करण्याचे गुन्हे इ.) कायद्यात बहिष्काराच्या तरतुदी आहेत. थोडक्यात, भारताचे नागरिक नसाल तर तुम्ही मतदान करू शकत नाही. दुसरे म्हणजे तुम्ही कायदेशीररित्या 'असक्षम' मानले गेले असल्यास मतदान करू शकत नाही. तुम्ही तुरुंगात किंवा पोलिस कोठडीत असलात तरी मतदान करू शकत नाही.

# गुपितं अंतराळातली



अंतराळात बऱ्याच अतर्क्य घटना घडत असतात. काही वर्षांपुर्वी पृथ्वीपासून जवळपास ३९ हजार प्रकाशवर्षं अंतरावर खूप मोठा स्फोट झाला. खगोलशास्त्रज्ञांनी या स्फोटाचा शोध लावला. हा 'बिग बँग'नंतरचा पृथ्वीवरचा सर्वात मोठा स्फोट होता. या स्फोटाचा शोध लावण्यासाठी पुण्यातल्या मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप, नासाची चंद्रा एक्स रे ऑब्जर्वेटरी आणि युरोपियन स्पेस एजन्सीच्या रेडिओ टेलिस्कोपचा वापर करण्यात आला. हा स्फोट ओफियुकस आकाशगंगेत झाल्याचं समोर आलं. ही आकाशगंगा पृथ्वीपासून ३९ कोटी प्रकाशवर्षं अंतरावर आहे. या स्फोटातून बरीच उष्णता बाहेर पडल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. आम्ही आकाशगंगांमधल्या बऱ्याच स्फोटांचं निरिक्षण केलं आहे. पण हा स्फोट जबरदस्त होता, असं ऑस्ट्रेलियामधल्या कार्टिन विद्यापीठातल्या मेलानी जॉनस्टन होलिट यांनी सांगितलं. आता या स्फोटावर अधिक संशोधन करण्यात येणार आहे. दरम्यान, नासाच्या केपलर या उपग्रहाने चार वर्षांच्या मोहिमेत १७ नैसर्गिक ग्रह शोधले आहेत. यापैकी एका ग्रहावर पृथ्वीप्रमाणे जीवसृष्टी बहरण्यास योग्य वातावरण असल्याचं शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. केआयसी-७३४०२८८ बी असं या ग्रहाचं नाव आहे. हा ग्रह आकाराने पृथ्वीच्या दुप्पट असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे या ग्रहावर जीवसृष्टी बहरू शकेल का, याबाबत शास्त्रज्ञ अधिक संशोधन करत आहेत.

# हिवाळ्यात जा काश्मीरला



प्रत्येकाची थंडीमध्ये बर्फवृष्टी पहायची इच्छा असते. यासाठी लोक थंड हवेच्या ठिकाणांना भेट देण्याची योजना आखत आहेत, जेणेकरून ते पांढऱ्या बर्फाची चादर पांघरलेल्या दऱ्या पाहण्याचा आनंद घेऊ शकतील. तुम्हालाही या वेळी हिवाळ्यात बर्फवृष्टी पहायची असेल तर भारतातील काही ठिकाणे यासाठी उत्तम आहेत.

**गुलमर्ग, जम्मू आणि काश्मीर**

गुलमर्ग भारतातील सर्वात सुंदर हिल स्टेशनपैकी एक आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात येथे जोरदार बर्फ पडतो. त्यामुळे संपूर्ण परिसर स्वर्गासारखा दिसतो. गुलमर्गमध्ये स्कीइंग, स्नो स्लेजिंग आणि केबल कार राइड्सचा आनंद घेता येतो. दरीत बर्फाच्छादित पर्वत आणि चीडच्या झाडांचे दृश्य कोणाचेही मन जिंकू शकते.

**मनाली, हिमाचल प्रदेश**

मनाली हे हिमाचल प्रदेशमधील एक प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे, जे हिवाळ्यात बर्फाने झाकलेले असते. शांत वातावरण आणि उंच बर्फाच्छादित पर्वत पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. सोलांग दरी आणि रोहतांग दर्रा सारखी ठिकाणे हिमप्रपात अनुभवतात आणि साहसी, उत्साही लोकांसाठी नंदनवन ठरतात. मनालीमध्ये आपण बर्फात कॅम्पिंगचा अनुभव घेऊ शकता.

**तवांग, अरुणाचल प्रदेश**

तवांग हे अरुणाचल प्रदेशामध्ये वसलेले एक ठिकाण आहे. येथे बर्फवृष्टीचे दृश्य खूप प्रेक्षणीय असते. येथे हिवाळ्यात डोंगर आणि दऱ्या बर्फाच्या दाट थरांनी झाकलेले असतात. जगातील सर्वात मोठ्या बौद्ध मठांपैकी एक असलेला तवांग मठ बर्फात पांढऱ्या चादरीने झाकलेला दिसतो. हे ठिकाण निसर्गप्रेमींसाठी आणि शांततेच्या शोधात असलेल्यांसाठी उत्तम आहे.

**औली, उत्तराखंड**

औलीमध्ये डिसेंबर ते मार्च या काळात बर्फवृष्टी होते. येथील विस्तीर्ण बर्फाच्छादित मैदान स्कीइंग, स्नोबोर्डिंग आणि इतर अनेक रोमांचक क्रियासाठी प्रसिद्ध आहे. येथून नंदा देवी आणि हिमालयातील इतर शिखरांचे दृश्य खूपच अद्भुत वाटते .

**नियोजन करताना...**

हिवाळ्यात प्रवास करण्यापूर्वी हवामानाची नक्की माहिती घ्या. बर्फावर चालण्यासाठी पकड तयार करण्यासाठी उबदार कपडे आणि बर्फाचे बूट घेऊन जा. हॉटेल्स आणि वाहतूक आगाऊ बुक करा, कारण हिवाळ्यात ही ठिकाणे पर्यटकांनी भरलेली असतात.

# अंत्यसंस्कारापूर्वी कापला केक, ठेवले फुगे!

छत्तीसगडच्या कवर्धा जिल्ह्यात अतिशय धक्कादायक आणि भावुक करणारी घटना घडली. एका बापाने आपल्या लेकीवर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी स्मशानात केक कापला, मृतदेहाजवळ फुगे फुगवले होते. केक कापून लेकीला भरवण्यासाठी तो मृतदेहाजवळ सरसावला अन् ओक्साबोक्शी रडला. तेथे उपस्थित असलेल्या नातेवाइकांसाठी हा क्षण अतिशय कठीण होता. या घटनेप्रसंगी अनेकांचे डोळे पाणावले. बापाने लेकीला वाढदिवसाची टोपीदेखील घातली.



सात ऑक्टोबर रोजी दहा वर्षांच्या अदिती भट्टाचार्यचा वाढदिवस होता. कोलकातावरुन वडील इंद्रजीत भट्टाचार्य आणि नातेवाइक कवर्धा येथे आले. त्यांनी निर्णय घेतला की, आधी लेकीचा वाढदिवस साजरा करायचा अन् मग तिच्यावर आणि तिची आई परम भट्टाचार्यवर अंत्यसंस्कार करायचे. ज्या मुलीचे हास्य एके काळी घराचा आनंद होता, ती आता फक्त एक आठवण बनून राहिली आहे. ज्या दिवशी इंद्रजीत आपल्या पत्नी आणि निष्पाप मुलीवर अंत्यसंस्कार करणार होते, तोच त्यांच्या प्रिय मुलीचा दहावा वाढदिवस होता.

मुलीच्या वाढदिवसाला घरी केक कापणाऱ्या वडिलांना तो अशा ठिकाणी कापावा लागला, जो सर्वांसाठी वेदनादायक होता आणि नंतर त्यांना आपल्या मुलीचे आणि पत्नीचे अंत्यसंस्कार करावे लागले. ज्या वाढदिवसाने घर आनंदाने भरून टाकायला हवे होते, त्या वाढदिवसात आता फक्त शांतता, अश्रू आणि राखेचा ढीग राहिला. मुलीच्या वाढदिवसाच्या दिवशीच तिचा आणि आईचा अपघात झाला. त्यात दोघींचे निधन झाले.

# करवा चौथच्या दिवशीच पतीचा पुनर्जन्म!

करवा चौथ हा प्रेम, श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक मानला जातो. या दिवशी पत्नी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास करतात आणि चंद्र पाहिल्यानंतर सोडतात; पण या वेळी मध्य प्रदेशमधील एका महिलेने असे कृत्य केले, ज्याने संपूर्ण देशाची मने जिंकली आहेत. तिने केवळ तिच्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली नाही, तर त्याला जीवनदानही दिले.

ही कहाणी आहे राजगड येथील प्रियाची. तिने तिच्या पतीला, पुरुषोत्तमला वाचवण्यासाठी तिची एक किडनी दान केली. ती म्हणते, ''हा माझा करवा चौथ आहे.'' राजगड या छोट्या शहरात राहणारी प्रिया आणि तिचा पती, पुरुषोत्तम एकमेकांसाठी एक उदाहरण बनले आहेत. पुरुषोत्तमला कोरोना झाला होता. बरे झाल्यानंतर, त्याला सतत डोकेदुखी आणि थकवा जाणवू लागला. त्याने डॉक्टरांचा सल्ला घेतला तेव्हा त्याला आढळले, की त्याच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत. डॉक्टरांनी इशारा दिला, की जर प्रत्यारोपण त्वरित केले नाही, तर त्याचा मृत्यू होऊ शकतो. कुटुंब घाबरले होते. कुणालाच काय करावे हे कळत नव्हते. त्याच क्षणी प्रियाने म्हटले, 'जर माझी किडनी माझ्या पतीचा जीव वाचवू शकली, तर हा माझा खरा करवा चौथ असेल.' हे ऐकून सर्वांच्या डोळ्यात पाणी आले.



पती म्हणाला, की मी माझ्या पत्नीचा खरा चंद्र आहे, त्यामुळेच मी चमकतो. वैद्यकीय चाचण्या घेण्यात आल्या आणि अहवालात स्पष्टपणे म्हटले गेले, की प्रियाची किडनी पुरुषोत्तमच्या किडनीशी परिपूर्ण जुळत होती. ऑपरेशनची तयारी सुरू झाली. डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली आणि काही दिवसांतच पुरुषोत्तमची प्रकृती सुधारू लागली. आता दोघेही पूर्णपणे ठीक आहेत आणि एकत्र त्यांचे नवीन जीवन सुरू करत आहेत. पुरुषोत्तम हसत हसत एका मुलाखतीत म्हणाले, 'मी माझ्या पत्नीला सांगतो, की मी आता तिचा चंद्र आहे. कारण तिच्यामुळे माझे आयुष्य चमकत आहे'. 'सोशल मीडिया'वर ही बातमी व्हायरल होताच लोकांनी प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. लोक भावनिक होऊन जोडप्याचे अभिनंदन करताना दिसले, तर काहींनी त्यांच्या हरवलेल्या प्रियजनांची आठवण केली. एका वापरकर्त्याने लिहिले, 'खरे प्रेम हेच असते; फक्त बोलल्याने ते सिद्ध होत नाही.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, 'प्रियाने ते केवळ व्यक्त केले नाही, तर तिचे प्रेम खरे आहे हे सिद्ध केले.'

# घराबाहेर हाकलली गेली, आता लाखोंची मालकीण!

आज आपण म्हणतो की मुलगा आणि मुलगी दोघे समान आहेत. एकीकडे आज प्रत्येक ठिकाणी महिला स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे, तर दुसरीकडे आजही मुलींना वाईट वागणूक मिळते. मुलगा आणि मुलगी दोघे समान आहेत असं अनेक ठिकाणी आपण पाहतो, पण मुलींना स्वतःला सिद्ध करून दाखवावं लागतं. असंच एका महिलेसोबत झालं आहे. चारही मुलीच झाल्यामुळे नवऱ्याने तिला घरातून हाकललं. अशात शिक्षण नाही, नोकरी नाही, उत्पन्नाचं साधन नाही आणि चार मुलींची जबाबदारी खांद्यावर पडल्यानंतर या महिलेने मोठा निर्णय घेतला आणि ती आज लाखो रुपयांची मालकीण आहे. एवढेच नाही, तर या महिलेने अन्य महिलांना रोजगार दिला आहे.



अशा कठीण परिस्थितीचा सामना करणाऱ्या महिलेचे नाव यास्मिन बेगम असे आहे. नवऱ्याने घरातून काढल्यानंतर यास्मिनने ठरवले, की आयुष्यात यापुढे कधीच कोणावर अवलंबून रहायचे नाही. यास्मिन हिने सांगितल्यानुसार, सुरुवातीला यास्मिनला त्रास झाला. पण तिने जिद्दीने नव्या आयुष्याला सुरुवात केली. शिवणकाम आणि भरतकामाची आवड होती, म्हणून तिने जुन्या शिलाई मशीनवर छोटे कपडे शिवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला परिसरातील महिला आपले कपडे शिवण्यासाठी तिच्याकडे येऊ लागल्या. हळूहळू, लोकांना तिचे काम आवडू लागले आणि ऑर्डर वाढू लागल्या.

सुरुवातीला यास्मिन दिवसाला दोन-तीन कपडे शिवायची. त्यामुळे घर चालवणं कठीण झालं होतं; पण हळूहळू मेहनतीला यश मिळू लागले. अशात काही पैसे जमा करून तिने नवीन शिलाई मशिन घेतली आणि घरातून व्यवसाय सुरू केला. आता गावातील अन्य दहा-बारा महिला तिच्यासोबत काम करतात. आज यास्मिन केवळ स्वतःसाठी पैसे कमावत नाही, तर इतरांना रोजगारदेखील देते. ती ब्लाउज, सूट, पेटीकोट, कुर्ता-पायजामा, मुलांचे कपडे आणि बरंच काही शिवते. सणासुदीच्या काळात तिला इतक्या ऑर्डर मिळतात की रात्रंदिवस काम करावं लागतं. आता यास्मिनचं मानसिक उत्पन्न चाळीस-पन्नास हजार रुपये असून वर्षाला लाखो रुपये कमावते.


यास्मिन म्हणजे, नवऱ्याने सोडलं तेव्हा वाटलं आता सर्व काही संपलं आहे; पण आता वाटतं, माणसाने ठरवलं तर तो सर्व काही करू शकतो. गोंडा जिल्ह्यातील लोक आता यास्मिन बेगमला धैर्यवान महिला म्हणतात. तिनं सिद्ध केलं आहे, की कठीण काळातही एखादी व्यक्ती खंबीर राहिली तर स्वतःचं नशीब घडवू शकते.

# शिक्षक कर्मचाऱ्यांना संस्थेतील गुलामगिरीच्या जाचातून मुक्त करा

## शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांचे डिजिटलायझेशन होण्यासाठी शासन निर्णय निर्गमीत करा : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे

नगर – सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने व वेळेवर पेन्शनचा लाभ मिळावा, यासाठी खाजगी शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांचे डिजिटलायझेशन करण्याबाबत शासन निर्णय (जी.आर.) तात्काळ निर्गमित करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर, आणि शिक्षण सचिव रणजीतसिंह देओल यांना पाठविले असल्याची माहिती परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्य सरकारने सामान्य प्रशासन विभागामार्फत ३ नोव्हेंबर २०२५ पासून ङ्गमहा ई–ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट सिस्टीम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या यंत्रणेमुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ वेळेवर आणि सुलभरीत्या मिळणार आहेत. मात्र, खाजगी शाळांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना मात्र अजूनही या सुलभ प्रक्रियेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, असा आरोप शिक्षक परिषदेने केला आहे.



महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवा अटी व शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ११ नुसार, नियुक्तीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत शिक्षक–कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका दोन प्रतींमध्ये तयार करून अद्यावत ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, वास्तवात अनेक शाळांत हे नियम कागदावरच मर्यादित राहिले आहेत. यामुळे शिक्षकांना संस्थाचालकांच्या दबावाखाली काम करावे लागते, तसेच सेवानिवृत्ती लाभ मिळवण्यासाठी आर्थिक सौदेबाजी सहन करावी लागते. अनेक शिक्षकांना पेन्शन, ग्रॅच्युइटी, व अन्य लाभ एक ते चार वर्षांपर्यंत विलंबाने मिळतात.

खाजगी शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन हा काळाचा भाग आहे. त्यावर आधारित त्यांना सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने आणि वेळेवर सर्व लाभ मिळायला हवेत, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने स्पष्टपणे म्हटले आहे. शिक्षकांच्या सेवा काळातील व सेवानिवृत्तीनंतरच्या लुबाडणुकीला आळा घालण्यासाठी शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

काही खाजगी शाळांतील शिक्षक आजही गुलामगिरीच्या जाचात अडकलेले आहेत. नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंत त्यांना आर्थिक लुबाडणूक व अपमान सहन करावा लागतो. शासनाने त्यांच्या सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन केल्यास ही अन्यायकारक स्थिती संपुष्टात येईल. शिक्षक कर्मचाऱ्यांना सन्मानाने व वेळेवर निवृत्ती लाभ मिळणे हा त्यांचा हक्क आहे. शासनाने यासाठी तातडीने जी.आर. निर्गमित करून शिक्षक वर्गाला दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी केली आहे.

# अमरधाम स्मशानभूमीत विधी करण्यासाठी येणाऱ्यांकडून मनपा सफाई कर्मचारी करतात पैशांची बेकायदेशीर मागणी

## तातडीने कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा : आम आदमी पार्टीकडून आयुक्तांकडे लेखी तक्रार

नगर – शहरातील नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीमध्ये विधी करण्यासाठी येणाऱ्या ब्राह्मणांकडून महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी पैशांची बेकायदेशीर वसुली करत असल्याचा आरोप आम आदमी पार्टीच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात आम आदमी पार्टीकडून महापालिका आयुक्तांना लेखी तक्रार दिली असून, तातडीने कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी हे नियमित वेतन, बोनस व सुविधा महापालिकेकडून घेत असताना, ते अमरधाम येथे विधी करण्यासाठी येणाऱ्यांकडून पैशांची मागणी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. पैसे न दिल्यास संबंधित कर्मचाऱ्यांकडून शिवीगाळ, अरेरावीची भाषा आणि पूजेला न येऊ देण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

विधी करणाऱ्यांकडून पैशांची मागणी करणे चुकीचे आहे. अशा प्रकारांवर तातडीने निर्बंध आणून महापालिकेने सर्व कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या प्रतिनिधींनी केली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांनी याची दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आम आदमी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, महिला अध्यक्षा ॲड. विद्याताई शिंदे, युवा अध्यक्ष विजय लोंढे, महासचिव दिलीप घुले, सुनील ठाकरे, बापू अशोक बनकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अहिल्यानगर ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्षपदी सचिन गुजर यांची निवड

नगर – अहिल्यानगर ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी अध्यक्षपदी श्रीरामपूर येथील सचिन गुजर यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार पक्षाचे वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी या नियुक्तीचे आदेश काढले आहेत.



काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त होते. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्याने पक्षाकडून हालचाल करण्यात येवून ज्या ठिकाणी पदे रिक्त आहेत तेथे नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या निवडीचे पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी स्वागत करत 'एक्स' वर सचिन गुजर यांना शुभेच्छा दिल्या.

गुजर यांची पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य, प्रभावी वक्तृत्व, प्रदीर्घ अनुभव आणि दांडगा जनसंपर्क या त्यांच्या बलस्थानांमुळे काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीस नवसंजीवनी मिळेल, असा मला पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांना नवी दिशा, नवचेतना आणि प्रेरणा लाभेल. त्यांच्या पुढील यशस्वी कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! असे थोरात यांनी एक्स वरील संदेशात म्हटले आहे.

## काँग्रेस शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी बाळासाहेब भंडारी यांची निवड

नगर – अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीवर कार्याध्यक्षपदी चंद्रकांत उर्फ बाळासाहेब भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी नियुक्ती केली आहे.बाळासाहेब थोरात व शहर जिल्हाध्यक्ष दिप चव्हाण यांच्या संमतीने सदर नियुक्ती करण्यात आली.



बाळासाहेब भंडारी हे काँग्रेस पदाधिकारी असून ते जैन ओसवाल समाजाचे विश्वस्त असून विविध सामाजिक संस्थांवर ते कार्यरत आहेत.

# अहिल्यानगर काँग्रेस शहर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

नगर – अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या केंद्रीय वर्किंग कमिटीने अहिल्यानगर शहर जिल्हा कमिटीच्या नव्या कार्यकारिणीला मान्यता दिली असून, या कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. ही कार्यकारिणी अखिल भारतीय कमिटीचे सचिव बी. एम. संदीप यांच्या मंजुरीने आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आली आहे. माजी मंत्री व केंद्रीय वर्किंग कमिटी सदस्य बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनुसार अहिल्यानगर कार्यकारिणीच्या निश्चितीसाठी दीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. ही कार्यकारिणी मंजुरीसाठी प्रदेश आणि केंद्राकडे पाठविण्यात आली होती. त्याला आता मान्यता मिळाली आहे.



दीप चव्हाण

यात कार्याध्यक्षपदी चंद्रकांत उर्फ बाळासाहेब भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी नियुक्ती पत्र दिले. तसेच शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नव्या कार्यकारिणीला मान्यता दिली आहे.

मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नव्या दमाची कार्यकारिणी जोमाने लक्षवेधी कामगिरी करेल. लवकरच ब्लॉक कमिट्या गठीत केल्या जातील. बूथ कमिट्याची घोषणा होईल. ब्लॉक अध्यक्षांची निवड व प्रभागनिहाय इच्छुक नगरसेवकांच्या मुलाखती घेण्यात येतील. काँग्रेस पक्ष मित्रपक्षांना बरोबर घेऊन निवडणूक लढवेल, महाविकास आघाडीच्या एकत्रित ताकदीने विजय मिळवू, असा मला पूर्ण विश्वास आहे. असे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

नवीन कार्यकारिणी मध्ये उपाध्यक्षपदी फैय्याजभाई शेख केबलवाले, प्रा. डॉ. बापू चंदनशिवे, खलील सय्यद, चंद्रकांत उजागर, निजामभाई जहागीरदार, अभिनव गायकवाड, नईम सरदार व उमेश साठे यांची निवड झाली आहे. खजिनदार म्हणून यश चव्हाण हे काम पाहतील. सरचिटणीसपदी मयूर पाटोळे, शम्स खान, मुबीन शेख, राजेंद्र कर्डीले, मनोज सत्रे, प्रकाश थोरात, अन्वरभाई सय्यद, आणि संतोष लोंढे या पदाधिकाऱ्यांना संधी देण्यात आली आहे. तर चिटणीस म्हणून अभिजित कांबळे, फारुख शेख, गणेश भोसले, संतोष जाधव, रमेश पाटील उर्फ आर आर, बशीरभाई शेख तर कार्यकारिणी सदस्य म्हणून हारुभाऊ सोनावणे, डॉ. रिजवान शेख, ॲड. पांडुरंग बल्लाळ, बापूसाहेब धीवर, काकासाहेब खेसे, अजय मिसाळ व मनोज गाडळकर यांचा समावेश करण्यात आला आहे.

पक्षाच्या घटनेनुसार, जिल्हा कमिटीचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, माजी मंत्री, आजी माजी खासदार, आमदार, लोकसभा विधानसभा निवडणुकीतील पक्षाचे उमेदवार, जिल्ह्यातील प्रदेश कमिटीचे पदाधिकारी, जिल्ह्यातील सर्व आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, कार्याध्यक्ष तसेच मनपाचे आजी माजी महापौर, उपमहापौर आणि गटनेते हे या कार्यकारिणीत कायम निमंत्रित सदस्य आहेत.

# पुण्यातील जैन समाजाच्या १ ऑक्टोबरला होणारे 'आमरण उपोषण आंदोलन' स्थगित

### नवी दिल्ली येथील जैन कॉन्फरन्सच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आचार्य श्री १०८ गुप्तीणंद जी गुरुदेव यांची भेट

पुणे – येथील जैन समाजाच्या एच एन डी हॉस्टेल प्रकरणी आचार्य श्री १०८ गुप्तीणंद जी गुरुदेव यांची श्री ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स श्वेतांबर स्थानकवासी नवी दिल्लीचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली व श्री ऑल इंडिया जेन कॉन्फरन्सचा पाठिंबा देण्यात आल्याची माहिती वसंत लोढा यांनी दिली. यावेळी ॲड.नरेश गुगळे, महाराष्ट्र चतुर्थ झोनचे उपाध्यक्ष श्याम चोरडिया, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य ॲड. राजेंद्र बलदोटा, संतोष गांधी, अनिल कटारिया, नितीन पटवा, शैलेश चंगेडिया आदी उपस्थित होते.



पुणे येथील सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टची मोडेल कॉलनी परिसरातील तीन एकर जागा चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने विक्री करून टाकली. यामुळे देशातील समस्त जैन समाज अत्यंत आक्रोषित आहे. ३० ऑक्टोबरला संस्थेचे विश्वस्त मंडळाच्यावतीने धर्मादाय आयुक्तांसमोर संबंधित जागेचा व्यवहार रद्द करण्यात येणार आहे. त्यामुळे येणारे १ नोव्हेंबरला होणारे आमरण उपोषणाचे आंदोलन स्थगित करण्यात येत आहे, अशी माहिती आचार्य श्री १०८ गुप्तीणंद जी गुरुदेव यांनी दिली आहे.

जैन कॉन्फरन्सने पाठिंबा दिल्याने समाजात मोठ्या प्रमाणात जागृती झाली आहे. जैन समाज हा मोठ्या प्रमाणात दानशूर आहे. जैन समाजाच्या बोर्डिंग ची तीन एकर ची जागा शैक्षणिक व धार्मिक उपक्रमासाठी विकसित करण्यासाठी समाजाने मोठ्या प्रमाणात निधी उभा करुन सहकार्य कराव, असे आवाहन आचार्य श्री १०८ गुप्तीणंद जी गुरुदेव यांनी केले आहे.

यावेळी ॲड.नरेश गुगळे व ॲड.राजेंद्र बलदोटा यांनी कायदेशीररित्या वस्तुस्थिती काय आहे, याविषयी सविस्तर माहिती दिली. जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा म्हणाले, महाराष्ट्रात येथून पुढे जैन समाजाची जागा गैरप्रकारे घेण्याचा प्रयत्न करू नये. जैन समाजात आता मोठ्या प्रमाणात जागृती झाली आहे.



स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सत्कार करताना राज्य साखर आयुक्त डॉ. सिद्धाराम सालीमठ.





समाजातील नवतरुण पिढीमध्ये आत्मविकासाची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने टीम उडान तर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारी सुवीर २.० पुच्छिसुणं स्पर्धेमध्ये सहभागी झालेले टिम उडानचे महिला स्वयंसेवक वर्ग. शेजारील छायाचित्रात आचार्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या उपस्थितीत सहभागी झालेले परिक्षार्थी.

# ज्ञान हेच आत्म्याचे खरे आभूषण : प्रविणऋषिजी म. सा.

## सुवीर २.० धार्मिक स्पर्धेत जैन समाजातील बालकांसह तरुणांचा सहभाग; ज्ञान, संस्कार आणि आत्मविकासाचा दीप उजळवणारा प्रेरणादायी सोहळा

नगर – ज्ञान हेच आत्म्याचे खरे आभूषण आहे. अशा प्रकारच्या स्पर्धा युवकांमध्ये धर्म, अनुशासन आणि आत्मविकासाची भावना प्रखर करतात. धर्माचा अभ्यास म्हणजे आत्म्याशी संवाद साधण्याची प्रक्रिया आहे, आणि या स्पर्धेमुळे युवकांना चालना मिळत असल्याचे आशीर्वचन देताना प्रविणऋषिजी म. सा. यांनी सांगितले.

समाजातील नवतरुण पिढीमध्ये संस्कार, धर्मज्ञान आणि आत्मविकासाची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने टीम उडान तर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारी सुवीर २.० पुच्छिसुणं स्पर्धा यंदा भव्यदिव्य वातावरणात पार पडली. पुणे येथील श्री संघ सांस्कृतिक भवनात हा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच प्रविणऋषिजी म. सा. यांच्या पावन सान्निध्यात उत्साह आणि आध्यात्मिकतेच्या वातावरणात झाला.

या स्पर्धेची मुख्य परीक्षा दोन गटांत विभागली गेली होती. पहिला गट ८ ते १३ वर्षांचा आणि दुसरा गट १४ ते २५ वर्षांचा होता. विशेष म्हणजे अवघ्या ५ वर्षांच्या लहान मुलांनीही या धार्मिक स्पर्धेत सहभाग नोंदवत सर्वांना थक्क केले. अल्पवयातच त्यांनी २९ गाथा कंठस्थ सांगून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या २९ गाथांमधून भगवान महावीरांच्या जीवनाचा आणि उपदेशांचा अत्यंत सुंदर व अर्थपूर्ण संदर्भ दिला जातो. महावीर स्तुतीचे मंगलगान मोठ्या श्रद्धेने करण्यात आले. या स्पर्धेमागील हेतू म्हणजे भावी पिढीत धर्मभावना, संस्कार व ज्ञानाची बीजे रोवणे हा असून टीम उडान ही परंपरा दरवर्षी जपते. यंदाच्या सुवीर २.० स्पर्धेला भारतातील विविध राज्यांप्रमाणेच परदेशातूनही मुला–मुलींचा प्रतिसाद मिळाला. दोन वर्षांपासून वीस वर्षांपर्यंतच्या स्पर्धकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. एकूण सुमारे १५०० पेक्षा अधिक बाल–तरुण स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले, तर नगर जिल्ह्यातून तब्बल शंभरपेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. नगर जिल्ह्यातील केंद्र आनंदधाम होते, अशी माहिती टीम उडानच्या वतीने अल्पना कासवा यांनी दिली. या स्पर्धेसाठी अहिल्यानगर येथून अस्मिता गांधी, रूपाली चंगेडिया, आरती पितळे, ममता कटारिया, पूनम भंडारी आणि कल्पना मुथा यांनी सक्रियपणे जबाबदाऱ्या पार पाडल्या.

कार्यक्रमादरम्यान विजेत्यांना पुणे समाजातील गणमान्य व्यक्ती अनिल नहार, सुरेश गांधी, कन्हैयालाल पारक, मधुबाला कटारिया, रवींद्र सांकला, लतिका सांकला यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पहिल्या गटात प्रथम पुरस्कार: सायकल, द्वितीय पुरस्कार: स्मार्ट वॉच, तृतीय पुरस्कार: स्टडी टेबल, तर दुसऱ्या गटात प्रथम पुरस्कार: किंडल ई–रीडर, द्वितीय पुरस्कार: फोनिक ग्लासेस, तृतीय पुरस्कार: नाईट लॅम्प विजेत्यांना प्रदान करण्यात आले. याशिवाय, ज्यांनी सर्व २९ गाथा कंठस्थ केल्या त्या २९ विद्यार्थ्यांना विशेष प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आले. तसेच महासती आदर्श ज्योतीजी महाराज आणि महासती श्री सुनंदाजी महाराज यांनी सर्व विजेत्यांचे कौतुक करुन टीम उडानला भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

जामखेड येथील बालस्पर्धकांनी धार्मिक नाटक आणि वाद्य प्रस्तुतीद्वारे आपली कला सादर केली. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थित सर्व प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे सुसंगठित आयोजन टीम उडानच्या सदस्यांनी केले.

समाजातील वरिष्ठ नागरिकांनी समितीचे अभिनंदन करत, तरुणांनी धर्म, संस्कार आणि मूल्यनिष्ठ जीवनाच्या दिशेने प्रेरित व्हावे असे आवाहन केले. पुरस्कार वितरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# २९ ऑक्टोबर जागतिक इंटरनेट दिवस

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो. इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे.

१९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञाान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत.

कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या log in शब्दापैकी lo शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेट दिन म्हणून साजरा केला जातो.

